रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३१६
www.ramprahar.com
रविवार, ४ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

**अंतरंग**

मविआ सरकारच्या काळातील ३३ महिने वाया गेले/२
रेवदंडा-साळाव पुलाचे काम प्रगतिपथावर/५
टीम इंडिया नव्या रूपात; व्हिडीओ केला शेअर/८




# ओडिशात मृत्यूचे तांडव

## रेल्वे अपघातातील मृतांचा आकडा २८८वर; ७००हून अधिक जण जखमी

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

**ओडिशातील बालासोरमध्ये झालेल्या तीन ट्रेनच्या भीषण अपघातातील मृतांचा आकडा २८८वर पोहचला असून ७००हून जास्त लोक जखमी झाले आहेत. शोध आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे, तर जखमींवर वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचार करण्यात येत आहेत.**



बालासोर जिल्ह्यातील बहनागा रेल्वेस्थानकाजवळ शुक्रवारी (दि. २) शालीमार-चेन्नई कोरोमंडल एक्स्प्रेस, बंगळुरू-हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेस आणि मालगाडी यांच्यात धडक होऊन भीषण अपघात झाला. बंगळुरू-हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेस हावडा येथे जात होती. शुक्रवारी सायंकाळी उशिरा या गाडीचे काही डब्बे रुळावरून घसरून बाजूच्या रुळावर उलटले. त्याचवेळी शालीमार-चेन्नई कोरोमंडल एक्स्प्रेस चेन्नईच्या दिशेने दुसऱ्या रूळावरून धावत होती. ही ट्रेन बंगळुरू-हावडा एक्स्प्रेसच्या रूळावर उलटलेल्या डब्ब्यांना धडकली. या धडकेनंतर कोरोमंडल एक्स्प्रेसचे काही डब्बे रूळावरून घसरले आणि पुढील रूळावर येत असलेल्या मालगाडीच्या डब्ब्यांना धडकले.

या अपघातातील मृतांचा आकडा हळूहळू वाढत जाऊन २८८वर पोहचला आहे, तर जखमींची संख्या ७४७ झाली आहे. मदतीकार्यासाठी विविध यंत्रणा कार्यरत आहेत.

### मदतीची घोषणा

या अपघातानंतर रेल्वे खात्याकडून मृतांच्या नातेवाईकांना १० लाख रुपयांची, तर गंभीर जखमींना दोन लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय पंतप्रधान मदत निधीतूनही मृतांच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली गेली आहे.

### चौकशीचे आदेश

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अपघातस्थळी भेट देऊन उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. आम्ही या अपघाताच्या मुळाशी जाऊन संपूर्ण घटनेची तपासणी करू, परंतु सध्या बचावकार्यावर लक्ष केंद्रित केले जात आहे, असेही रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी म्हटलेय.

एनडीआरएफ टीमलाही पाचारण करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर लष्करानेही या मदत आणि बचावकार्यात भाग घेतला आहे.



## दोषींवर कठोर कारवाई होणार -पंतप्रधान नरेंद्र मोदी

### घटनास्थळाची पाहणी; जखमींची विचारपूस

**बालासोर** : ओडिशातील रेल्वे अपघातस्थळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. ३) भेट देऊन माहिती घेतली तसेच रुग्णालयात जाऊन जखमी प्रवाशांची विचारपूस केली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव सोबत होते. या वेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, ही एक वेदनादायक व गंभीर घटना आहे. प्रत्येक कोनातून चौकशी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. दोषी आढळलेल्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घटनास्थळी पाहणी करून बचावकार्य पथकातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. घटनास्थळावर उपस्थित कॅबिनेट सचिव आणि आरोग्यमंत्र्यांसोबतही त्यांनी चर्चा केली. यानंतर पंतप्रधान मोदी रुग्णालयात गेले. तेथे त्यांनी जखमी प्रवाशांसोबत संवाद साधला तसेच डॉक्टरांकडून त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती घेतली. या वेळी त्यांनी शोकग्रस्त कुटुंबांना गैरसोयीचा सामना करावा लागणार नाही आणि जखमींना आवश्यक ती मदत मिळत राहावी यासाठी विशेष काळजी घेण्याचे निर्देश दिले.

## संजय राऊतांच्या बोलण्याने आम्हाला भोके पडत नाहीत



**अजित पवारांचा पलटवार**

**मुंबई : प्रतिनिधी**

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संदर्भात प्रश्न विचारताच ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत ऑन कॅमेरा थुंकले होते. या कृतीचे राज्यभर पडसाद उमटत आहेत. सर्वांनी तारतम्य बाळगले पाहिजे, अशी प्रतिक्रिया विरोधी पक्षनेते आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी दिली होती. त्यावर अजित पवारांच्या जुन्या वक्तव्याचा दाखला देत संजय राऊतांनी टीका केली. या सर्व प्रकरणात पुन्हा अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला होता. ठाकरेंना उष्णता सहन होत नसल्याने ते परदेशात गेले असतील, असे शिंदे म्हणाले. याबाबत पत्रकारांनी संजय राऊतांना प्रश्न विचारला, मात्र श्रीकांत शिंदेंचे नाव ऐकताच संजय राऊत ऑन कॅमेरा थुंकले. त्यांच्या या कृतीचा सर्वत्र निषेध झाला.

आपली काही संस्कृती, परंपरा आहे, इतिहास आहे. आपल्याला सगळ्यांनी यशवंतराव चव्हाणसाहेबांनी सुसंस्कृत महाराष्ट्र कसे काम करू शकतो याबाबत दाखवून दिले आहे, असे राष्ट्रवादीचे नेते अजित पवार म्हणाले तसेच संजय राऊतांची दुसरी बाजू ऐकायला मिळाली की, त्यांना कसला तरी त्रास होतोय, परंतु प्रत्येकाने तारतम्य ठेवून बोलावे, असे पवार म्हणाले होते.

पत्रकारांनी याबाबत राऊतांना विचारले असता धरणांमध्ये मुतण्यापेक्षा थुंकणे चांगले, असे विधान त्यांनी केले. यानंतर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली. 'ते काही बोलल्याने आम्हाला काही भोके पडत नाहीत. ती मोठी माणसे आहेत. त्यांनी काय बोलावे तो त्यांचा अधिकार आहे,' असे म्हणत पवारांनी प्रत्युत्तर दिले.

## माणगावच्या बेपत्ता व्यापाऱ्याचे अपहरण

### ७२ तासांनी सुखरूप परतले

**माणगाव : प्रतिनिधी**

येथून बेपत्ता झालेले व्यापारी नारायण गंगाराम शेट ७२ तासांनी घरी परतले. अज्ञात व्यक्तींनी त्याचे अपहरण केले होते.

७४ वर्षीय नारायण शेट ३१ जूनला दुकान उघडत असताना एका व्यक्तीने बोलण्यात गुंगवून गाडीतून अज्ञातस्थळी नेले. संधी मिळताच त्यांनी तेथून पलायन केले. यात एकूण आठ आरोपी सामील असल्याचे समजते. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

## पुण्यात साकारणार पाच हजार कोटींचा गुंतवणूक प्रकल्प

### हजारो तरुणांना मिळणार रोजगार

**पुणे : प्रतिनिधी**

बेरोजगार तरुणांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चांगली बातमी दिली आहे. पुण्यात पाच हजार कोटींचा गुंतवणूक प्रकल्प येत असल्याची माहिती त्यांनी दिली. ते शनिवारी (दि. ३) पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

बजाज फिनसर्व कंपनी पुणे येथे पाच हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामुळे ४० हजार जणांना रोजगार मिळणार आहे. अलीकडच्या काळातील राज्यात झालेली ही सर्वांत मोठी गुंतवणूक असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. हळूहळू पुणे हे फायनान्स हब होणार आहे. फिनटेकचेही हब बनत आहे. या कराराने त्याला बूस्ट मिळणार आहे. त्यामुळे बजाज फिनसर्वचे मी या निमित्ताने अभिनंदन करतो, असेही त्यांनी म्हटले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे दानशूर व लाडके व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने शुक्रवारी (दि. २) न्हावेखाडी रामबाग येथे जल्लोष सुवर्णयुगाचा हा कार्यक्रम सादर झाला.

न्हावेखाडी ग्रामस्थ मंडळ आणि श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीच्या वतीने श्री सत्यनारायणाची महापूजा तसेच स्टेप आर्ट डान्स अकॅडमी प्रस्तुत व पप्पू सूर्यराव निर्मित जल्लोष सुवर्णयुगाचा हा कार्यक्रम झाला. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### केंद्राकडून धोकादायक १४ औषधांवर बंदी

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या १४ प्रकारच्या फिक्स्ड-डोस कॉम्बिनेशन औषधांवर बंदी घातली आहे. डीजीसीआय म्हणजेच भारतीय औषध नियामक मंडळाने या घातक औषधांवर बंदी घालण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला होता. त्यानंतर सरकारने मोठे पाऊल उचलत या औषधांवर बंदी घातली आहे.

### डॉ. तात्याराव लहाने यांचा राजीनामा मंजूर



**मुंबई** : येथील जेजे रुग्णालयातील नेत्ररोग विभागाचे वरिष्ठ प्रमुख डॉ. तात्याराव लहाने आणि डॉ. रागिणी पारेख यांनी अंतर्गत वादातून नऊ डॉक्टरांसमवेत राजीनामा दिला होता. तो स्वीकारण्यात आला आहे. राजीनामा मंजूर केल्याबद्दल मी सरकारचे मनापासून आभार मानतो, असे लहाने यांनी म्हटले आहे.

## पारंपरिक पद्धतीने वटपौर्णिमा साजरी




**कर्जत : प्रतिनिधी**

वटपौर्णिमा शनिवारी (दि. ३) उत्साहात साजरी झाली. सुटी असल्याने चाकरमानी महिला दुपारच्या सुमारास वटवृक्षाची पूजा करण्यासाठी बाहेर पडल्या. कडक उन्हाळा असल्याने सुहासिनी अगदी संध्याकाळपर्यंत मनोभावे वटवृक्षाची पूजा करीत होत्या.

यंदा विवाहसोहळे नेहमीप्रमाणे उत्साहात पार पडले. अगदी काल-परवापर्यंत विवाह होत होते. त्यामुळे वटपौर्णिमेसाठी नववधूंची संख्या मोठी होती. पारंपरिक वेशभूषा करून सुहासिनी वटवृक्षाला फेऱ्या मारण्यासाठी तयार होत्या. विविध कामांसाठी अनेक जुने वड तोडण्यात आल्याने सुहासिनींना वटवृक्षाची पूजा करण्यासाठी पायपीट करावी लागली, तर काही महिलांनी वडाच्या झाडाच्या फांद्या घरी आणून पूजा केली.

हल्लीच्या मोबाईलच्या जमान्यात काही सुहासिनींना सेल्फीचा मोह आवरता आला नाही, तर काहींनी अद्याप शाळा सुरू नसल्याने आपल्या लहान मुलांसह पूजेचा मुहूर्त साधला. 'सात जन्मी हाच नवरा मिळू दे' अशी प्रार्थना करून वटपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.



# मविआ सरकारच्या काळातील ३३ महिने वाया

## मंत्री चंद्रकांत पाटील यांची टीका

**अमरावती : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सर्वसमावेशक, कौशल्याधिष्ठित असल्याने शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांपर्यंत धोरणाची वैशिष्ट्ये, कार्यपद्धती याची माहिती पोहचणे आवश्यक होते, पण महाविकास आघाडी सरकारच्या काळात 'न'सुद्धा लिहिला गेला नाही. अक्षरशः ३३ महिन्यांचा कालावधी वाया गेला, अशी टीका उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी (दि. ३) येथे केली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अमृत महोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, आमदार सुलभा खोडके, आमदार प्रवीण पोटे, माजी आमदार बी. टी. देशमुख, भाजपचे शहराध्यक्ष किरण पातूरकर आदी उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्रात करण्याची तयारी सुरू आहे, पण त्याची कुणावरही सक्ती नाही, असे मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले.



आगामी काळात समाजाची आवश्यकता लक्षात घेऊन अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. जगातील बहुतांश मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांचे सीईओ हे मूळ भारतीय वंशाचे आहेत. भारत हा तरूणांचा देश आहे. भारतीय विद्यार्थ्यांची ग्रहणशक्ती चांगली आहे. त्यांच्यासाठी येत्या काळात भरपूर संधी उपलब्ध आहेत. शिक्षणमंत्री दीपक केसरकर हे नुकतेच जर्मनीला जाऊन आले. तेथे चार लाख कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे. व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम राबविल्यास तेथील गरज आपल्याला पूर्ण करता येऊ शकेल, असे मंत्री पाटील यांनी सांगितले.

राज्यातील सुमारे अकराशे अनुदानित महाविद्यालयांपैकी ४५० ते ५०० महाविद्यालयांनी यंदापासून शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करणे अपेक्षित आहे. मध्यंतरीच्या काळात महाविकास आघाडी सरकारच्या दुर्लक्षामुळे त्याला उशीर झाला. आमचे सरकार येऊन जेमतेम वर्ष झाले, तरीही आम्ही हे धोरण लागू करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांना क्रेडिट गुणांकन पद्धतीनुसार अभ्यासक्रम शिकवला जाणार. म्हणजेच प्रत्येक विषयाचे क्रेडिट निश्चित केले जाणार तसेच यात एकसमानता आणली जाणार आहे, असेही मंत्री पाटील यांनी नमूद केले.

# महडमधील पाणीटंचाईप्रश्नी महिला झाल्या आक्रमक

## नगरपंचायतीवर धडक

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायत हद्दीतील महड गावात सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. त्यामुळे वैतागलेल्या महिला खालापूर नगरपंचायत कार्यालयवर धडकल्या. पाणी प्रश्न प्रशासनाने सोडवावा अशी मागणी या आक्रमक महिलांनी केली.

अष्टविनायकांपैकी एक क्षेत्र असलेल्या महड गावातील नागरिकांना दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी विहिरीवर योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, मात्र महडमधील विहीर सध्या कोरडी पडल्याने त्यामध्ये बोरवेलद्वारे पाणी टाकण्यात येत आहे. जवळपास २५० ते ३०० कुटुंबासाठी ही योजना आहे, मात्र बोअरवेलही कोरड्या पडल्याने पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे.

गावाची पाणी योजना नगरपंचायतीने ताब्यात घेऊन सुरळीत पाणीपुरवठा करावा यासाठी मोठ्या संख्येने महिला खालापूर नगरपंचायत कार्यालयात



जमा झाल्या होत्या. त्यावर तूर्त टँकरने पाणीपुरवठा करण्यात येईल तसेच सोमवारी याबाबत तहसील कार्यालयात बैठक घेऊन तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

**चाळीस वर्षांत अशी पाणीटंचाई नव्हती. काही खाजगी बोअरवेलमधून प्रचंड पाणी उपसा होत असून व्यावसायिक कारणासाठी बोअरवेलचा वापर होतो. अशा बोअरवेलवर कारवाई होणे आवश्यक आहे.**

**–गीता गणपत पाटील, महड ग्रामस्थ**

# शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा




**पनवेल : वार्ताहर**

शिवसेनेचे पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत मोठ्या उत्साहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त गुरुवारी तळोजा येथील परमशांतीधाम वृद्धाश्रमात फळ व चादरींचे वाटप करण्यात आले तसेच लाडू तुला करून त्यांचे वाटप करण्यात आले, तर कळंबोलीमध्ये आरोग्य शिबिराचे घेण्यात आले.

शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी वाढदिवशी कार्यकर्त्यांना आवाहन केले होते की, हार-तुरे, पुष्पगुच्छ न आणता शैक्षणिक साहित्य भेट द्या. त्या अनुषंगाने कार्यकर्त्यांनी दोन टन वह्या जमा करून वही तुला करण्यात आली. या वह्या परिसरातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटण्यात येणार आहेत.

दरम्यान, शेवाळे यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून अनेक महिला आणि तरुणांनी हाती शिवबंधन बांधले. या वेळी पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परमार स्कूल, होली एंजल्स स्कूलचा १०० टक्के निकाल

**नागोठणे : बातमीदार**

दहावीच्या परीक्षेचा निकाल ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात आला. यामध्ये नागोठणेजवळील वेलशेत येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या एस. डी. परमार इंग्लिश मडियम स्कूलने यशस्वी निकालाची परंपरा कायम राखत यंदाही १०० टक्के लावला आहे.

या निकालात स्कूलमधील विद्यार्थिनी आर्या अवधूत लिमये हिने सुमारे ८७ टक्के इतके गुण संपादित करुन स्कूलमध्ये प्रथम येण्याचा मान मिळवला. हनिया शकील हकीम (८५.४० टक्के) आणि रितुल राजेश श्रीवास्तव (८२.८० टक्के) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे भाएसोचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन, खजिनदार सुरेश जैन, मुख्याध्यापक भूषण टके यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



नागोठण्यातील नीव सोशियल अ‍ॅण्ड एज्युकेशन ट्रस्टच्या होली एंजल स्कूलचे सर्वच्या सर्व ६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने या शाळेचाही दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे.

रुजल रोहिदास हातनोलकर (९३ टक्के) हिने प्रथम, तर अक्षया किरण पत्की (९१.८० टक्के) व ऍरन जॉन पेरिकाविल (९१.२० टक्के) हे विद्यार्थी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आणि होली एंजल्स स्कूलचे मुख्याध्यापक विजय मुल्कवाड, उपमुख्याध्यापक मुकेश मिसाळ, हेड मिस्ट्रेस निलिमा राणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# मुंबई ऊर्जा मार्ग प्रकल्प उभारणीसाठी हेलिकॉप्टरचा वापर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या विजेचा तुटवडा भरून काढण्याच्या उद्देशाने राबविल्या जाणाऱ्या मुंबई ऊर्जा मार्ग प्रकल्पामध्ये प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात आहे. निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जे जे आवश्यक ते सारे करण्यासाठी हीसंस्था कटिबद्ध आहे. म्हणूनच दुर्गम डोंगररांगांच्यात उच्च वीज दाबाच्या वाहिन्या आणि टॉवर उभारणीसाठी कंपनी हेलिकॉप्टरचा वापर करीत आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारे हेलिकॉप्टरचा वापर करून प्रकल्प उभारणी करण्याची ही पहिलीच घटना असावी.



सध्या या प्रकल्पासाठी अंबरनाथ तालुका ते पनवेल तालुका यांच्यादरम्यान असणाऱ्या डोंगररांगांच्यात उच्च वीज दाब वाहून नेणाऱ्या वाहिन्या आणि टॉवर उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. साधारणपणे १४ किलोमीटर लांबीच्या वाहिन्या या दुर्गम डोंगररांगांतून जाणार आहेत. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत टॉवर उभारणीचे काम करावे लागते. कितीही खडतर परिस्थिती असली तरीही प्रकल्प वेळेत पूर्ण झालाच पाहिजे या विजिगिषु वृत्तीने कंपनी अत्याधुनिक विकसन प्रणालीचा अवलंब करीत आहे.

अंबरनाथ तालुक्यातील मलंगवाडी येथील हेलिबेसचे ऍव्हेशन हेड राहुल उनियाल यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी वापरण्यात येणारे हेलिकॉप्टर हे उत्कृष्ट दर्जाचे असून ते चालविणाऱ्या पायलट्सकडे हजारो तासांचा अनुभव आहे.

## स्वामी समर्थ समाज मंदिराचा वर्धापन दिन

**उरण : वार्ताहर**

शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ समाजमंदिर व बालसंस्कार केंद्राचा पाचवा वर्धापन दिन सोहळा मंगळवारी (दि. ६) होणार आहे. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

वर्धापन दिनानिमित्त सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८.१५ वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांचा अभिषेक, ९ ते १२ वाजता श्री स्वामी सारामृत, हवनयुक्त पाठ, १०.३०. वाजता नैवेद्य, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद, ४.३० ते ६ वाजता श्री स्वामी समर्थ पालखी सोहळा, ६.३० वाजता नैवेद्य आरती व कार्यक्रमाची सांगता आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## रोहा पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकालाचा 'चौकार'

**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यातील इंग्रजी माध्यमाची शाळा असलेल्या रोहा पब्लिक स्कूलची शंभर टक्के निकाल लागण्याची परंपरा यंदा सलग चौथ्यांदा कायम राहिली. या वर्षी या शाळेतून २९ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेस बसले होते. हे सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

रोहा पब्लिक स्कूलमधून प्रथम क्रमांक अनू गोपाल शर्मा (९२ टक्के), द्वितीय विवेक विनोदकुमार महतो (८७.८० टक्के), तृतीय क्रमांक दिक्षिता अजय जाधव (८५.८०) यांनी मिळवून यश संपादन केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे रोहा वेलफेअर ट्रस्टचे अध्यक्ष समीर सकपाळ, उपाध्यक्ष समिधा सकपाळ, खजिनदार हसमुख जैन, सहाव्यवस्थापका शौषा सुरज, मुख्याध्यापिका संघमित्रा डोंगरदिवे व शिक्षकवृंदाने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, रोहा तालुक्यातील शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर असलेल्या कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मेहंदळे हायस्कूलचा दहावीचा निकाल ९४.३५ टक्के लागला आहे. या विद्यालयात पहिल्या तीन क्रमांकावर मुलींनी बाजी मारली आहे.

या विद्यालयातून १९५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम क्रमांक सृष्टी उमाजी टेंबे (९२.८० टक्के), द्वितीय सानिका नरेश बैकर (९२.२० टक्के), तृतीय क्रमांक रिद्धी विशाल थळे (९१.६० टक्के) हिने प्राप्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांचे चेअरमन, मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी अभिनंदन केले.

# रोह्यात नव्या शैक्षणिक वर्षासाठी शाळा सज्ज

**रोहे : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात शिक्षणाचा पाया म्हणून ओळख असलेल्या जिल्हा परिषद शाळा २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी सज्ज झाल्या आहेत. एका शाळेचा अपवाद वगळता अन्य शाळांची डागडुजी झाली आहे.

रोहा तालुक्यातील शाळांची दुरुस्ती पूर्ण झाली असून महाळुंगे शाळेची काही प्रमाणात दुरुस्ती शिल्लक आहे. तीही पूर्ण होणार असल्याची शिक्षण विभागाकडून माहिती मिळाली आहे. त्यामुळे नव्या शैक्षणिक वर्षासाठी शाळा सज्ज झाल्या आहेत.

रोहा तालुका हा ग्रामीण भाग आहे. यासह काही भाग डोंगर भागात असल्याने या ग्रामीण भागातील मुलांसाठी जिल्हा परिषद शाळा ही जवळची आहे. प्राथमिक शिक्षण सातवीपर्यंत या शाळेतून होत असतो. तालुक्यात जिल्हा परिषद अंतर्गत २१५ प्राथमिक शाळा आहेत. या शाळा नव्या शैक्षणिक वर्षासाठी तयार झाल्या आहेत.

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेच्या शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचा कणा असलेल्या शिक्षक नव्या शैक्षणिक वर्षासाठी रूजू होणार आहेत. रोहा तालुक्यात सध्या ३८० शिक्षक कार्यरत आहेत, तर चार केंद्रप्रमुख सध्या कार्यरत आहेत.

आज तालुक्याचे ग्रामीण भागात पालकवर्ग आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे म्हणून चांगल्या इंग्रजी शाळेमध्ये घालत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळेतील मुलांचा पट कमी होताना दिसत आहे. जिल्हा परिषद शाळेत नव्या शैक्षणिक वर्षात पटसंख्या वाढवण्याचे शिक्षकांसमोर मोठे आव्हान आहे.

# रुचकर व आरोग्यवर्धक शेवळं बाजारात दाखल

**पाली : प्रतिनिधी**

शेवळं ही रानभाजी जिल्ह्यात पालीसह काही ठिकाणी दाखल झाली आहे. अतिशय सकस व रुचकर असलेल्या या रानभाजीला अनेकांची पसंती आहे. मागील वर्षी २० रुपयांना मिळणारी एक जुडी यंदा ३० रुपयांना मिळत आहे. अनेक आदिवासींना ही भाजी विकून रोजगार मिळतो. शिवाय ही भाजी दाखल झाली म्हणजे लवकरच पावसाचे आगमन होण्याचे संकेत आहेत.

एका मर्यादित कालावधीतच ही भाजी उपलब्ध होते. सध्या ही भाजी बाजारात आल्याने खवय्ये खुश आहेत. भाजी तयार करण्यासाठी बोंडग्याचा पालादेखिल लागतो, कारण या पाल्यामुळे भाजी खवखवत नाही. त्यामुळे आदिवासी महिला शेवळांबरोबरच बोंडग्याचा पालादेखील जुडीसोबत ठेवतात. पावसाळ्याच्या सुरुवातीस व नंतर हा भाव कमी होऊन २० किंवा १० रुपयांना जुडी मिळेल. तुर्तास तरी खवय्ये उपलब्ध या रानभाजीचा आनंद घेत आहेत.




**शेवळं भाजी खाण्यास चविष्ट आहे तसेच आरोग्यासही उत्तम असते. घरात आवर्जून ही भाजी बनवितो. घरातील मंडळी ती अतिशय चवीने खातात. सध्या बाजारात लवकरच शेवळं उपलब्ध झाल्याने आम्हाला खूप आनंद होत आहे.**

**–छाया म्हात्रे, शिक्षिका, पाली**

### अशी बनवा भाजी

**आधी भाजी नीट धुवून स्वच्छ करुन घ्यावी. त्याबरोबरच बोंडग्याचा पालादेखील स्वच्छ धुवावा. नाहीतर खवखवण्याची भीती असते. त्यानंतर भाजी बारीक चिरून घ्यावी. कांदा मसाल्यावर तेलात परतून घ्यावी. किंवा थपथपीत (जाड) रस्सा करावा. भाजीत चिंच, कैरी, आंबोशी किंवा कोकम घालावे. त्यामुळे भाजी खवखवत नाही व चविष्ट लागते. गरम गरम चपाती किंवा भाकरी सोबत खावी. भाजीची आमटीदेखील केली जाते. याबरोबरच सोडे किंवा सुकी मासळी टाकून देखील खातात.**

### पोषणाचा खजिना

**शेवळाची भाजी पोटाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. स्त्रियांच्या आरोग्यासाठी ही भाजी महत्त्वाची मानली जाते. या रानभाजीत आतड्यातील हानिकारक जीवाणू नष्ट करण्याची क्षमता असते. ही भाजी रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. या भाजीत तंतूमय घटक जास्त असल्याने वजन कमी करण्यासाठी ही भाजी लाभदायक आहे. शेवळाची भाजी पोटाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. या भाजीमुळे आतड्यातील चांगल्या जीवाणूंची संख्या वाढते. शेवळामधे जीवनसत्त्वे, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजं असतात. यात बी१२ आणि ड जीवनसत्त्वं मोठ्या प्रमाणात असतात.**

# लोकेश चंद्रा यांनी पदभार स्वीकारला



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून लोकेश चंद्रा (भाप्रसे) यांनी शुक्रवारी (दि. २) पदाची सूत्रे स्वीकारली आहे. याआधी ते मुंबई बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक पदी कार्यरत होते.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा हे १९९३च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आहेत. त्यांनी आयआयटी (दिल्ली) मधून स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी आणि एमटेक (स्ट्रक्चर्स) पदवी प्राप्त केली आहे.

चंद्रा यांनी यापूर्वी सिडकोचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नागपूर महापालिकेचे आयुक्त म्हणून काम केले आहे तसेच नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्ष म्हणून चंद्रा कार्यरत होते. सन २००८ ते २०१५ या कालावधीत ते केंद्र शासनाच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर होते. या काळात चंद्रा यांनी पोलाद मंत्रालयाचे सहसचिव व ऊर्जा मंत्रालयाचे संचालक म्हणून काम पाहिले आहे. त्यांना नव्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## दुखवटा



### पार्वतीबाई मुळे

**चौक** : वावंढळवाडी गावच्या पार्वतीबाई नामदेव मुळे यांचे नुकतेच वयोमानानुसार निधन झाले आहे. पार्वतीबाई या आई म्हणून गावात परिचित होत्या. प्रत्येक सुखदुःखात त्यांचा सहभाग असायचा. वारकरी संप्रदायाचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांच्या अंत्यसंस्कारसमयी पंचक्रोशीतील लोक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कै. पार्वतीबाईंच्या पश्चात मुले, सूना नातू, आहेत.

# वाहतूक नियमांच्या उल्लंघनप्रकरणी २५,४९२ वाहनांवर कारवाई

## तीन महिन्यांत १५,४९,१५० रुपये दंड वसूल

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरीभाऊ बनकर यांनी सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सहाय्याने कळंबोली वाहतूक शाखेच्या हददीत माहे मार्च २०२३ ते मे २०२३ या तीन महिन्यांचे कालावधीत वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या एकुण २५,४९२ कसुरदार वाहनचालक यांचेवर मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये कारवाई केली आहे.

यामध्ये एकूण १,९१,११,१०० रुपये इतका दंड आकारण्यात आलेला आहे. त्यापैकी १५,४९,१५० रुपये इतका दंड कसुरदार वाहन चालक अथवा मालक यांच्याकडुन वसुल करण्यात आलेला आहे.

याचबरोबर हददीत मॅकडोनाल्ड येथे थांबणारे बसचालक, हद्दीतील रिक्षाचालक, वाहनचालक व वाहतूकदार संघटना यांचे बैठका घेऊन त्यांना वाहतूक नियमांची माहिती देण्यात असून नियमांचे पालन करणेबाबत समज देण्यात येत आहे. या कारवाईमुळे कसुरदार व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालक यांचेमध्ये वाहतूक नियमांचे पालन होत असल्याचे दिसुन येत आहे.

भविष्यातदेखील वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अशा प्रकारचे कसुरदार वाहनचालक यांच्या विरूध्द जास्तीत जास्त कारवाई करण्यात येत आहे. याकरीता सर्व नागरिक अथवा चालक यांना अवाहन करण्यात येते की, त्यांनी वाहतूक नियमांचे पालन करून नवी मुंबई वाहतूक विभागास सहकार्य करावे, असे आवाहन कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बनकर यांनी केले आहे.






**पनवेल : भाजपचे वळवली बूथ अध्यक्ष महेश वामन पाटील यांचा मुलगा आर्यन महेश पाटील दहावीच्या परीक्षेत ९४.८० टक्के मिळवून उत्तीर्ण झाला आहे. त्याबद्दल त्याचे मारुती महादेव चिखलेकर, सचिन कृष्णा चौधरी यांनी अभिनंदन केले.**



**कामोठे : ओमकार यशवंत हुद्दार यांच्या ओमकार रियलटी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स या व्यवसायाच्या ऑफिसचे उद्घाटन पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्त झाले. या वेळी रवींद्र जोशी, किर्ती भयानी, अरुण शिंदे, मनोहन हुदार, गणेश हुदार, राजेश हुदार, संदीप पाटील, प्रदीप हुदार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

# प्रशांत पाटीलांनी केलेले आरोप बिनबुडाचे

## स्थानिक क्रशर प्लांटधारकांचा जोरदार पलटवार

**पनवेल, उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस प्रशांत पाटील यांनी २६ मे रोजी वाशी येथील स्वकार्यालयात पत्रकार परिषद घेऊन स्वराज स्टोन एलएलपीवर तीन हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप केला तसेच या कंपनीला स्थानिक क्रशर प्लांट धारकांचा विरोध असूनसुद्धा राजकीय दबावाने करार करण्यात आल्याचे म्हटले होते. प्रशांत पाटील यांचे आरोप बिनबुडाचे आणि निराधार ठरवत स्थानिक क्रशर प्लांट चालक मालकांनी काउंटर पत्रकार परिषद घेऊन प्रशांत पाटील यांनी केलेल्या आरोपांच्या चिंधड्या उडवल्या तसेच बिल्डर लॉबी आणि आरएमसी प्लांट लॉबीची प्रशांत पाटील दलाली करीत असल्याचे म्हटले आहे.

श्री कान्होबा दगड खाण व क्रशर मालक चालक सामाजिक संस्थेच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे ६७ सदस्य असलेल्या संघटनेचे सुमारे ४० सदस्य पत्रकार परिषदेला उपस्थित होते. अध्यक्ष सुनील भोईर, उपाध्यक्ष मनोज आंग्रे आणि सचिव अतुल भगत यांनी उपस्थितांना संबोधित केले. भगत म्हणाले किप्रशांत पाटील स्वतः ची राजकीय पोळी भाजण्यासाठी अशी पत्रकार परिषद घेत आहे. मुळात जनाधार नसणाऱ्या या नेत्याला स्वबळावर एक ग्रामपंचायतसुद्धा निवडून आणता आलेली नाही. स्वराज स्टोन एलएलपी या कंपनीमुळे कुणाचेही नुकसान होणार नाही, उलट सरकाच्या तिजोरीत स्वामित्व धानाच्या रूपाने महसुलात तिप्पट वृद्धी होणार आहे. आमच्या सारख्या स्थानिक उद्योजकांना स्थिर भाव मिळणार आहे. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे मुंबईमधील बिल्डर लॉबी आणि रेडिमेड सिमेंट प्लांट लॉबी जी सरकार आणि आमची लूट करत होते त्याला आळा बसणार आहे.

भगत यांनी सविस्तर समजावून सांगितले की, कोरोना विषाणू संक्रमणामुळे या व्यवसायाची पार वाट लागली होती. बँकांचे हप्ते थकले होते. त्यामुळे या माफिया लॉबीने भाव पाडून आमची पिळवणूक सुरू केली होती. माल पडून राहण्यापेक्षा येतोय त्यादरात विकलेला बरा या भूमिकेतून आम्ही धंदा करत होतो. त्यात पराकोटीची स्पर्धा होतीच, प्रत्येकाने चार ते पाच कोटी रुपयांचे कर्ज काढले होते. ३४ क्रशर अशा खडतर परिस्थितीमुळे बंद पडले आहेत. अशात स्वराज या कंपनीने येऊन आम्हाला स्थिर भाव दिला. आज सर्व व्यवहार स्वामित्व धन देऊन आणि जीएसटीसह देयके बनवून केला जात आहे. खडीसाठी भाववाढ झाल्याने घरांच्या किमती वाढतील, असा प्रशांत पाटील यांनी आरोप केला तो अत्यंत बिनबुडाचा आणि बालिश आहे. मुळात भाववाढ झाली आहे ती स्वामित्व धन, वस्तू व सेवा कर हे सारे जोडल्यामुळे, आम्हालादेखील समाधानकारक स्थिर भाव मिळाला आहे.

क्रशर व्यावसायिक थकलेले हप्ते, वाढलेले डिझेलचे दर, ३० ते ४५ दिवसांची द्यावी लागणारी उधारी, कच्च्या मालाचे वाढलेले दर या साऱ्याने त्रस्त झाले होते. त्यामुळे अशात आम्हाला स्वराज कंपनी आशेचा किरण वाटते. आमच्यात कायदेशीर पद्धतीने करार झालेला आहे. तो करणे कुणालाही बंधनकारक नव्हते, परंतु आमच्या सदस्यांनी स्वयंस्फूर्तीने करार केले आहेत. प्रशांत पाटील यांच्या पाठी कुणीही नाही. ते केवळ बिल्डर आणि आरएमसी वाल्यांची दलाली करीत आहेत.

पत्रकार परिषदेला सुनील भोईर, मनोज आंग्रे, अतुल भगत या पदाधिकाऱ्यांच्या सह ताहीर पटेल, रमण बोहरा, सचिन वास्कर, सतीश घरत, दीपक ठाकूर आदींच्या सह अन्य सदस्य उपस्थित होते.



**आम्हाला आमचे अधिकार मिळवून देण्यासाठी भूमिपुत्रांना रक्त सांडावे लागले. पाच हुतात्म्यांना प्राणाची आहुती द्यावी लागली. प्रकल्पग्रस्तांना भूमी अधिग्रहणाचे योग्य पुनर्वसन मूल्य मिळवून देतांना आमचे भाग्यविधाते दिवंगत दि. बा. पाटील यांनी साडेबारा टक्के परताव्यासोबत येथील खाण पट्टा स्थानिकांच्या उदरनिर्वाहासाठी राखून ठेवण्यास शासनाला भाग पाडले. या ठिकाणी आमच्या व्यवसायावर कुणी नियंत्रण ठेवावे याच्याबाबत आम्ही विचारविनिमय करून संघटनेच्या माध्यमातून निर्णय घेत असतो. त्यामुळे आम्हाला कुणीही गृहीत धरून आमच्या वतीने वक्तव्य करू नयेत.**

**–सुनील भोईर, अध्यक्ष**

**प्रशांत पाटील यांच्या विश्वासार्हतेच्या बाबत आम्ही काय सांगावे? अहो अजितदादांचे सुपुत्र पार्थ पवार हे मावळ लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत असताना त्यांच्यासोबत प्रशांत पाटील यांना फिरून दिले नाही. हेतुपुरस्सरपणे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस असूनसुद्धा त्यांना लांब ठेवले होते. ते स्वपक्षाचे होऊ शकले नाही, ते अन्य कुणाचे काय होणार?**

**–अतुल भगत, सचिव**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त अहमदनगर चिंचोडी पाटील येथील न्यू इंग्लिश स्कूल कमिटी चेअरमन आबासाहेब कोकाटे, सदस्य आप्पासाहेब पवार, सल्लागार मंडळाचे सदस्य साहेबराव कोकाटे, ॲड. लक्ष्मण हजारे, मुख्याध्यापक श्री. दिगे आदींनी शुभेच्छा दिल्या. या वेळी अनिल कोकाटे व अन्य उपस्थित होते.**

# बेताल वक्तव्य करणाऱ्या संजय राऊतांचा जोडे मारो आंदोलनाने निषेध

**पनवेल : वार्ताहर**

ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांना शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासंदर्भात प्रश्न विचारला असता संजय राऊत थुंकल्याची घटना घडली. भर पत्रकार परिषदेत वाहिन्यांच्या कॅमेऱ्यासमोरच राऊत यांनी ही कृती केली. या कृतीचा संताप संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे.

पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी कळंबोली येथील मध्यवर्ती कार्यालय येथे संजय राऊत यांच्या प्रतिमेला जोडेमारो अंदोलन केले. या वेळी रामदास शेवाळे यांनी शेलक्या शब्दात संजय राऊत यांचा समाचार घेतला. शकुणी मामाची उपमा देत त्यांनी राऊत यांच्या प्रतिमेला जोडे मारले. या वेळी कामोठे शहर प्रमुख सुनिल गोवारी, खारघर शहर प्रसाद परब, कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, नवीन पनवेल शहर प्रमुख शिवाजी थोरवे, नितिन गुलदगड, सुधिर ठोंबरे, सत्यम मिश्रा, विभाग प्रमुख दीपक कोडवते यांच्यासह शेकडो शिवसैनिक व कार्यकर्ते उपस्थित होते.




**आमच्या नेत्याचे नाव घेऊन थुंकणे हे संजय राऊत यांनी अशोभनीय वर्तन केले असून ते उद्धव ठाकरे गटाचे शकुनी मामा आहेत. त्यांनीच ठाकरे गटाची वाट लावली. आदरणीय एकनाथ शिंदेसाहेबांच्या शांत व संयमी स्वभावामुळे आम्ही शिवसैनिक शांत असून भविष्यात जर पुन्हा राऊत अशी कृती करीत असतील तर त्यांना शिवसेना स्टाईल उत्तर देण्यात येईल.**

**–रामदास शेवाळे, शिवसेना जिल्हाप्रमुख पनवेल**

## दहावीच्या परीक्षेत ‘सीकेटी’च्या मराठी माध्यमिक विभागाचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमिक विभागाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल ९८.६८ टक्के लागला आहे.

यामध्ये आयुष मंगेश गोयजी याने ९३ टक्के गुण मिळवून प्रथम, अजित गणेश आढे याने ९२.४० टक्के गुण मिळवून द्वितीय तरे तुषार विठ्ठल लांबोर याने ९१.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

विद्यालयातून १५२ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेस बसले असून यातील ६६ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य, ६१ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, १८ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी तसेच पाच विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण श्रेणी मिळविली आहे. दोन विद्यार्थ्यांना अेटीकेटी लागली आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, तसेच संस्थेचे कार्यकारिणी मंडळाचे सर्व सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# गव्हाण विद्यालयातील दहावीच्या गुणवंतांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२३ मध्ये घेतलेल्या एसएससी अर्थात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनियर कॉलेजमधील गुणवंत विद्यार्थ्यांनी देदीप्यमान यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीच्या वतीने चेअरमन अरुणशेठ भगत यांचे हस्ते करण्यात आला.

जान्हवी हरेश घरत हिने ९३.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, श्वेता बाबासाहेब घाडगे हिने ९३.२० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक तर दीपक सुदाम बचाटे ह्याने ८९.६० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात तृतीय क्रमांक पटकावल्या बद्दल अरुणशेठ भगत व स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी यांचे हस्ते पुष्पगुच्छ व मिठाई भरवून त्यांचा सन्मान करण्यात आला.

एस.एस.सी.बोर्ड परीक्षेच्या उज्वल आणि यशस्वी निकालाची परंपरा कायम राखत याही वर्षी विद्यालयाने ९५.२६ टक्के शे. निकालाने शाखेचा सन्मान वृद्धिंगत केला. यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार सोहळा विद्यालयाच्या प्रांगणात स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, मावळत्या प्राचार्या साधना डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, इयत्ता दहावीच्या तिन्ही तुकड्यांचे वर्गशिक्षक अनुक्रमे चित्रलेखा पाटील, सागर रंधवे व संदीप भोईर, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, नितीन ठाकूर गुरूजी, रयत सेवक धनाजीराव ठाकूर आप्पा, गुणवंत विद्यार्थी, पालक हरेश घरत व बाबासाहेब घाडगे आदी उपस्थित होते.



## ‘पीईएस’च्या सर्व शाळांचा दहावीचा निकाल १०० टक्के

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरासह तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात नावाजलेल्या पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या (पीईएस) सर्व शाळांचा दहावीचा निकाल यंदा १०० टक्के लागल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे व या सर्वांचे अभिनंदन इकबाल काझी यांनी केले आहे.

या मध्ये याकूब बेग हायस्कूल ज्युनियर कॉलेज पनवेल सेमी इंग्लिश विभागाचा १०० टक्के लागला आहे. त्यामध्ये मासिरा सादिक शेख (९३टक्के) प्रथम, बतूल हनिग पटेल (८७.६० टक्के) द्वितीय, अफ्रा नजीब दळवी ८६ टक्के तृतीय आला आहे. त्याचपमाणे अँग्लो उर्दू हायस्कूल, बारापाडा या शाळेचाही निकस १०० टक्के लागला आहे. त्यामध्ये नहरीन दळवी ९१.२० टक्के गुण मिळवत प्रथम, झुबिया दळवी ८२.४० टक्के गुण मिळवून द्वितीय व लमतुरे फातिमानाज ७९ टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. त्याचप्रमाणे नॅशनल उर्दू हायस्कूल तळोजा या शाळेचाही निकाल १०० टक्के लागला. यामध्ये प्रथम ताइब अर्शद पटेल ९३.२० टक्के, द्वितीय आदिला फारूक पटेल ९०.८० टक्के व खदिजा मुनाफ मुल्ला ९०.२० मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे प्रेसिडेंट इकबाल हुसेन काझी यांच्यासह सर्व कमिटी पदाधिकारी, सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षकांनी त्यांचे अभिनंद करून पुढील शैक्षणिक वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# जग मे रह जायेंगे प्यारे तेरे बोल...

**राज कपूर या नावातच बरेच काही इस्टमनकलर असं सामावलयं. ज्याचा शोध कधीच संपणार नाही आणि संपूही नये असे व इतकं त्यात आहे. कलरफुल आहे आणि ब्लॅक अँड व्हाईटही आहे... पृथ्वीराज कपूरचा मुलगा, शम्मी व शशी कपूर यांचा मोठा भाऊ, (कालांतराने पित्याची जबाबदारी) अभिनेता, प्रगल्भ निर्माता, कल्पक दिग्दर्शक, दृश्य माध्यमाची जाण असलेला संकलक, अनेक अभिनेत्रींचा सखा (सोबती), गीत संगीत व नृत्याचा जाणकार, आर. के स्टुडिओचा मालक 'बरसात'च्या यशानंतर त्याने चेंबूरला स्टुडिओ उभारला.**

'आवारा'तील स्वप्नदृश्य याच स्टुडिओत चित्रीत झाले), दूरदृष्टी असलेला आणि त्याच वेळेस 'रुपेरी स्वप्न पाहणारा', ग्लॅमरचा तडका, गॉसिप्सचा राजा, रुढी परंपरा पाळणारा (आर. के. स्टुडिओतील होळी, श्रीगणेशोत्सव) अशा अनेक गोष्टींची केमिस्ट्री असलेला अस्सल फिल्मवाला. हा शोमन चित्रपट या माध्यम व व्यवसायासाठीच जन्माला आला असून 'कपूर खानदाना'तील तो 'द ग्रेट' अदाकारा आहे. मला कायमच 'राज कपूर' या वलयांकिताचे कौतुक आणि कुतूहल वाटत आले









आणि ते कधी पूर्ण होईलसं वाटत नाही...अस्सल फिल्मवाला असावा तर अस्साच.

१९८८ ची गोष्ट. आपल्या देशातील सर्वांत प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार नवी दिल्लीतील सोहळ्यात राज कपूरने स्वीकारल्याची बातमी वृतसंस्थेवर आली आणि काही वेळातच बातमी आली, राज कपूरला कार्यक्रम स्थळीच अस्वस्थ वाटू लागल्याने इस्पितळात दाखल करण्यात आले आहे...

त्या मे महिन्यात जवळपास रोजच राज कपूरच्या तब्येतीविषयी काही बातमी असे. (चॅनेलपूर्वीचे ते युग होतं) राज कपूरला उपचारासाठी मुंबईत आणले गेले अशा काही बातम्यांमुळे वृत्तपत्र कार्यालयात एक विषय चर्चेत आला, राज कपूरवरचे लेख, फोटो यांची तयारी करुन ठेवावी काय? तेव्ही मुद्रित माध्यमात हाताने हेडिंगचे खिळे लावणे, मजकूर कंपोझ करणे, फोटोचा ब्लॉक बनवणे, पान लावून घेणे अशी मोठी प्रक्रिया असतानाच ही तयारी किती दिवस टिकेल हाही प्रश्न होताच. महिन्याभरात ते पान मोडावे लागले आणि २ जून १९८८ रोजी संध्याकाळनंतर वृतसंस्थेने बातमी दिली, शोमन राज कपूरचे निधन.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

दिलीपकुमार, देव आनंद व राज कपूर या त्रिमूर्तीपैकी एक तारा निखळला. राज कपूरचा मृतदेह चेंबूर येथील आर. के. कॉटेज येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आल्याचे समजल्यावर गिरगावातून न्यूज रिपोर्टींगसाठी जात असताना 'राज कपूर हे नाव पहिले कधी ऐकले? ' याचा विचार करत असतानाच 'मेरा नाम जोकर ' आठवला. जीना यहा मरना यहा असं भलं मोठ सत्य सांगणारा चित्रपट.

१९७० साली दिलीपकुमारचा 'गोपी', देव आनंदचा 'जॉनी मेरा नाम' आणि राज कपूरचा 'मेरा नाम जोकर ' हे बड्या हीरोंचे चित्रपट काही आठवड्यांच्या अंतराने प्रदर्शित होत असतानाच रसरंग साप्ताहिकात याविषयी वाचण्याचा योग आला. प्रत्येक काळातील नवीन पिढीला एकाद्या गोष्टीची ओळख होण्यासाठी असं काही भारी घडणं आवश्यक. 'जोकर' हा राज कपूर अभिनित/निर्मित/दिग्दर्शित महाखर्चिक चित्रपट म्हणून गाजत असतानाच दोन मध्यंतरनी प्रदर्शित झाला. मला आठवतय, ग्रॅन्ट रोडच्या नॉव्हेल्टी थिएटरवरील 'जोकर 'चे सर्कसचे भव्य डेकोरेशन पाह्यला आम्हा भावडांना वडिलांनी आवर्जून नेले होते. चित्रपट संस्कृतीची बहुस्तरीय ओळख होण्यातील ही एक छोटीशीच गोष्ट. पण लक्षात राहणारी.आठवड्याभरातच रसरंगमध्ये बातमी आली, काही दृश्ये कापून 'जोकर ' एका मध्यंतरचा करण्यात आला... 'जोकर ' पडला की पाडला यावर पानभर लेख होता. आजही यावर लिहिलं जातेय हे एक प्रकारचे यशच. राज कपूरचा 'संगम' ( १९६४) असाच दोन मध्यंतरचा चित्रपट यशस्वी ठरल्याचा 'फ्लॅशबॅक ' जोकरनिमित्ताने 'फोकस'मध्ये आला.

राज कपूरचे जुने चित्रपट पाहण्यासाठी तेव्हा 'गल्ली चित्रपट' ही संधी. जिस देश मे गंगा बहती है, श्री ४२०, सपनों का सौदागर हे तेथेच पाहिले. मॅटीनी शोला अनाडी, चोरी चोरी पाहिले, अशातच दूरदर्शन आले आणि जागते रहो, छलिया पाह्यले. चित्रपट पाहत जाताना 'कलाकारामधील अष्टपैलुत्वा'ची ओळख होत जाते.... आणि 'बॉबी' (१९७३) आला. रोमॅन्टीक वादळच आले..

राज कपूरचा कायमस्वरुपी सर्वात तरुण चित्रपट म्हणजे 'बॉबी' हे आजही तो पुन्हा पुन्हा पाहताना दिसतेय. तेव्हा मेट्रोच्या पडद्यावर हाऊसफुल्ल गर्दीत ते पाहिलं, आज मोबाईलवर यू ट्यूबवर पाहतो तरी 'पिक्चरमधला टवटवीतपणा' तोच. कारण राज कपूर कायमच तरुण मनाचा होता. खरा सिनेमाला कायमच तारुण्यात असायलाच हवा. राज कपूरसारखा.

राज कपूर हे एक जबरदस्त रसायन आहे याची ओळख होण्याचा योग 'बॉबी'ने दिला. या प्रेमपटात राजा (ऋषि कपूर) मिसेस ब्रगेन्झा ( दुर्गा खोटे) याना भेटायला त्यांच्या वस्तीत जातो तेव्हा बेल दाबल्यावर बॉबी (डिंपल कापडिया) दरवाजा उघडते तेव्हा तिच्या डाव्या हाताला लागलेले चणा पिठ ती बटा सरकवताना त्या बटांना लागते हे अगदी अस्सेच राज कपूर व नर्गिसच्या खऱ्याखुऱ्या पहिल्या भेटीत घडल्याचे किस्से गाजू लागले.

नर्गिस राज कपूरची हुकमी नायिका, तो विवाहित असूनही ते दोघे एकमेकांकडे आकृष्ट झाले. राज कपूरची अधिक ओळख होण्याच्या गोष्टी अनेक. 'संगम'च्या वेळेस वैजयंतीमालात राज कपूर गुरफटत गेल्याच्या कथा-दंतकथा अनेक. राज कपूरमधील कल्पक दिग्दर्शक आपल्या चित्रपटातील 'अभिनेत्रीं'मधील गुणवत्ता व सौंदर्य (याचा क्रम कसा होता हे राज कपूर जाणे) पडदाभर खुलवायचा हे झीनत अमान (सत्यम शिवम सुंदरम), मंदाकिनी (राम तेरी गंगा मैली) वगैरेतही दिसले. चित्रपट टेबलावर घडतो, त्याचे पटकथा लेखन व संकलन ही या माध्यमाची ताकद असे राज कपूर मानायचा हे त्याच्या कलाकृतीत दिसते.

राज कपूर हा बहुरंगी, बहुढंगी, बहुरुपी विषय. आपल्या देशातील सिंगल स्क्रीन थिएटर्सपासून सोविएत युनियन, चीन, इराण, मध्य पूर्वेतील देश असा सगळीकडे राज कपूर 'हीरो' झाला. 'आवारा 'ने राज कपूरला विदेशात ओळख दिली. बीबीसी दूरदर्शनवर हा चित्रपट दाखवला गेला. भारतातील सर्वोत्कृष्ट शंभर चित्रपटात 'आवारा'चा समावेश होतो. हे 'दिग्दर्शक राज कपूरचे यश'. हाच राज कपूर संजय खान दिग्दर्शित 'चांदी सोना', 'अब्दुल्ला' अशा चित्रपटात भूमिका कशी बरे साकारतो अशा प्रश्नांवर राज कपूरचे म्हणणे असे, अशा वेळी आपल्यातील दिग्दर्शक सेटबाहेर ठेवतो.

'राज कपूर' या संस्थेबाबत कितीही जाणून घ्यावे तेवढे थोडेच. आपले पिता पृथ्वीराज कपूर यांच्या पृथ्वी थिएटरमध्ये सर्व प्रकारची कामे करीत या क्षेत्रात पाऊल टाकले. कधी तो रंगमंचावरील विदूषक असे तर कधी 'दीवार' नाटकातील नोकर व पडदे ओढणारा बॅकस्टेज आर्टिस्ट असे.

राज कपूर ही एका सरळ रेषेत जाणारी कथा, पटकथा व संवाद नाही. हाच राज कपूर १९८३ साली भारतीय क्रिकेट संघाने लॉर्डसच्या मैदानात वेस्ट इंडिज संघाचा पराभव करून विश्व चषक जिंकल्यावर मुंबईत रात्रभर विजयी मिरवणुका निघाल्या असता त्याच वेळेस एका पार्टीवरून घरी जात असलेला राज कपूर आपल्या गाडीतून उतरला आणि त्यानेही ताल धरला याची बातमी झाली...

अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टींतून 'राज कपूर' जगला. आपल्या स्टुडिओतील होळीच्या रंगापासून ते आपल्या चित्रपटाचे पोस्टर कसे असावे याची कल्पक आखणी करण्यापर्यंत हा बहुस्तरीय प्रवास आहे. मी मिडियात आल्यावर राजीव कपूरची भूमिका असलेल्या 'जिम्मेदार' या चित्रपटाच्या मुहूर्ताच्या पार्टीत पहिल्यांदा राज कपूरचे लाईव्ह दर्शन घेतले तेव्हा प्रचंड गोरागोमटं असं हे प्रचंड प्रतिभा असलेले व्यक्तीमत्व प्रत्यक्षात पाहतोय हे क्षणभर खरंच वाटेना...

राज कपूरच्या निधनाच्या वेळेस आर. के. कॉटेजमध्ये त्यांचे अंत्यदर्शन घेताना राज कपूर म्हणजे, न संपणारा (आणि संपूही नये) असाच चित्रपट आहे अशीच भावना होती. तीन चार फिल्मवाल्यांच्या श्रध्दांजलीच्या प्रतिक्रिया लिहून घेताना माझे हेच मत अधिकाधिक पक्के कधी झाले ते समजलेच नाही...













**वाऱ्याची मंद झुळूक, झुळझुळ वाहणारा झरा, हिरवाकंच डोंगर त्यातून अलगत येणारा प्रकाशाचा एक किरण, मनाला मोहून टाकणारा, आनंद देणारं निसर्गाच हे दान संपूर्ण मानव जातीला मिळालेले वरदान आहे. हे वरदान असेच जपून ठेवूया! त्याची उधळपट्टी केली, तर विनाश नक्कीच होणार हे जणू तो आपल्या कृतीतून दाखवत असतो.**

# पर्यावरण संरक्षण, करू वृक्षारोपण...!

आज कोरोनाने जे शक्य नव्हते ते देखील करून दाखवले एवढ्याशा एका विषाणूने ऑक्सिजनचे महत्व सिद्ध केले. जगण्यासाठी केवळ पैसा नाही तर ऑक्सीजन हवा. श्वास केवळ पैशाने मिळत नाही तो झाडापासून मिळतो आणि मलाच जर तू तुझ्या स्वार्थासाठी तोडत राहिलास तर ही जीवसृष्टी कशी जगणार? कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आज प्रत्येक मानवाला माझे महत्त्व कळले आहे. हे आपणास ज्ञात आहे.

या वर्षी भारतामध्ये प्रथमच जमिनीचे तापमान ४६ डिग्री पर्यंत नोंदवले गेले आहे. वाचताना सोपं वाटत असलं तरी याचे होणारे परिणाम अतिशय भयानक आहेत. याची जाणीव आपल्याला या उन्हाळ्यात झालीच आहे. यामध्ये सर्वसामान्य माणसांनप्रमाणेच, पशुपक्षी सर्वांनाच जगणे मुश्कील होईल. जलस्त्रोत आटुन जातील, भूगर्भातील पाणीही कमी होईल, हळूहळू वृक्ष वठणे, जमिनीमधील आद्रता निघून गेल्याने जमीनीला भेगा जाणे, झुडपे वेली या हळूहळू मरू लागतील व त्यामुळे सर्वच जैवविविधता टप्प्याटप्प्याने नष्ट होऊ शकते.

जागतिक तापमान वाढीचे दुष्टचक्र सुरू झालेले आहे, याला थांबवता येणार नाही मात्र सर्वांनी मिळून प्रयत्न केल्यास हे थोडे लांब ठेवता येऊ शकते व यासाठी सर्वांनी मिळून जास्तीत जास्त झाडे लावून जगवणे व त्याच बरोबर आहे ते एक एक झाड मौल्यवान म्हणून सांभाळणे हेच केले पाहिजे.

आज अनेक ठिकाणी वृक्ष लागवडीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहे अशा उपक्रमातून आपण आपला वृक्ष लागवड साठी सहभाग नोंदवला पाहिजे या ऑक्सिजनमुळे झाडांची निगराणी आपोआप होईल वृक्ष लागवडीमुळे यांचे संगोपन होऊन माझे रक्षण होईल पक्षांना त्यांचा नैसर्गिक अधिवास उपलब्ध होईल.

जर एकट्याने झाडे लावून सांभाळणे होत नसेल तर आजच आपल्या आपल्या भागातील विविध संस्था ज्या मोकळ्या जागांवर व डोंगरांवर वृक्षारोपण करत असतात त्यांची माहिती घेऊन त्यात सामील व्हा. जेणेकरून एका मोठ्या ग्रुपमध्ये काम झाल्याने झाडे वाचायची शक्यता किती तरी पटीने वाढते.

अरे पर्यावरण दिनी माझे तुम्ही खूप गुणगान गाता मानवा माझे स्टेटस ठेवून माझे महत्व सिध्द करता पण संगोपण करणे का विसरतोस? अरे मानवा मी तुझ्यासाठीच आहे, तेव्हा माझे रक्षण कर म्हणजेच स्वतः चे जीवन रक्षण कर...

खरंच मनुष्य हा निसर्गाशी बांधलेला आहे. निसर्ग पर्यावरण याशिवाय मानव जगू शकत नाही पृथ्वीवरील सर्व सजीव सृष्टीचा आधार हे पर्यावरण आहे त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे मानव जातीस नव्हे तर सर्व सजीव सृष्टीला अत्यावश्यक आहे. मानवी संस्कृतीचा जसा विकास होत गेला तस तसे निसर्ग सानिध्य कमी होऊ लागले पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या मानवी अस्तित्वाचा प्रकट खुणा आहेत. निसर्गावर नितांत प्रेम करणाऱ्या ऋषीमुनींनी आपल्याला वारंवार पर्यावरणाचे महत्त्व सांगितले आहे. साठी वृक्ष लागवड वृक्ष संवर्धन आणि आपली मनापासून असलेली श्रमनिष्ठा मोलाची आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरे ही ओळ सिद्ध करणे ही आमची जबाबदारी आहे.

वृक्षतोड थांबवा वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला आहे आणि त्याचे विपरीत परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे आपण जस आपल्या अस्तित्व संकटात आणले आहे आपल्याला कोरोनान दाखवले आहे. मानवाने ते समजून त्याचा विनाश होण्यापासून वाचविले पाहिजे व आपले जीवन समृद्ध केले पाहिजे.

वृक्षांची महती प्राचीन काळापासून गायली गेली आहे. वृक्षाचा प्रत्येक अवयव मानवास उपयुक्त आहे. त्यांच्याजवळ कसलाही भेदभाव नाही सर्वांवर ते मायेने बरसात करतात समान वागणूक देतात आज श्वास घेण्यासाठी ऑक्सिजन विकत तो घ्यावा लागत आहे आज पर्यंत ज्या झाडांनी आपल्याला मोफत ऑक्सिजन दिला त्यांची कदर कधी केलीच नाही.

आताही वेळ गेलेली नाही....शासनाने आणि आपण स्वतः झाडे लावा, झाडे जगवा हा कार्यक्रम पुर्ण क्षमतेने घराघरात आमलात आणल्यास भविष्य काळात,आपल्या पुढच्या पिढीला हिरवागार निसर्गाची साथ लाभेल... अन्यथा सर्व काही येणारा काळ सांगेल व आपली पुढील पिढी रोज आपणास जाब विचारल्या शिवाय राहाणार नाहीत.

***झाडे लावू झाडे जगवू आणि***
***पर्यावरणाचे रक्षण करू,***
***हेच आपले कर्तव्य समजू***
***वृक्ष संवर्धनाची क्रांती करू!***

**-रेश्मा धुमाळ, मुरूड**

# सदाबहार अशोक सराफ

अशोक सराफ हे मराठी चित्रपटसृष्टीतील गुणी आणि दमदार अभिनेता म्हणून अवघ्या हिंदुस्थानाला परिचीत आहे. मराठी चित्रपटसृष्टी बरोबरच हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगांवकर यांच्यासोबत त्यांनी मराठी विनोदी चित्रपटांची मालिकाच केली. अशोक सराफ यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



अशोक सराफ हे मुळचे बेळगाव या गावचे पण त्याचा जन्म मुंबईतील चिखलवाडी येथे झाला. त्यांचे बालपणही येथेच गेले. त्यांचे शिक्षण डी. जी. डी. या विद्यालयात झाले. अभिनयाची आवड असल्याने वयाच्या अठराव्या वर्षापासूनच अभिनयास सुरुवात केली. शिरवाडकरांच्या ययाती आणि देवयानी या व्यावसायिक नाटकापासून त्यांनी रंगमंच्यावर प्रवेश केला. यानंतर दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार मधील इरसाल पोलीस, राम राम गंगाराम मधील म्हमद्या खाटिक यांसारख्या बहुरंगी भूमिका त्यांनी साकारल्या. त्यांनी आपले कामाचे क्षेत्र मर्यादित न ठेवता त्यांनी विनोदी, खलनायक तसेच गंभीर पात्रेही पडद्यावर साकार केली आणि त्यातून आपली वेगळी शैली निर्माण केली. ऐंशीच्या दशकात अशोक आणि लक्ष्या या जोडीने रूपेरी पडद्यावर धमाल उडवून दिली. अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दाणादाण यांसारख्या चित्रपटांच्या माध्यमातून त्यांनी मराठी प्रेक्षक वर्गास पोटभरुन हसवले. अशोक सराफांच्या अभिनय उभारुन यायला दिग्दर्शक सचिन पिळगांवकर आणि महेश कोठारेही तितकेच साथीदार आहेत. अशोक सराफांचे काही उल्लेखनिय चित्रपट नवरी मिळे नव-याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा, एक उनाड दिवस, शुभमंगल सावधान, आई नंबर वन, आजही लोकांच्या मनात घर करून आहेत.

पत्नी अभिनेत्री निवेदिता जोशी-सराफ बरोबर त्यांनी स्वत:ची निर्मिती संस्था चालू केलेली आहे. त्याद्वारे काही मालिकांची निर्मिती त्यांनी केली आहे. टिव्ही मालिकांमध्ये त्यांची सर्वात गाजलेली मालिका म्हणजे 'हम पांच'. अशोक सराफांनी चित्रपट संख्या कमी केलेली असली तरी प्रेक्षक अजूनही त्यांच्या नवीन चित्रपटांच्या प्रतिक्षेत असतात.

**(साभार : मराठी वर्ल्ड)**

# 'खो-खो' चित्रपटाचा ओटीटीवर प्रीमियर

मराठी ओटीटी प्लॅटफॉर्ममध्ये आपल्या वेगवेगळ्या कन्टेंटने चर्चेत असलेल्या अल्ट्रा झकास ओटीटी प्लॅटफॉर्मवर बहुप्रशंसित मल्याळम भाषेतील 'खो-खो' हा चित्रपट मराठी भाषेत प्रीमियरसाठी सज्ज झाला आहे. 'खो-खो' हा २०२१चा मल्याळम भाषेतील क्रिडा विषयवर आधारित चित्रपट आता जगभरातील प्रेक्षकांसाठी मराठीमध्ये उपलब्ध होणार आहे.




'खो-खो' या चित्रपटाची कथा तिरुअनंतपूरममधील माजी ॲथलीट मारिया फ्रान्सिसभोवती फिरते, जिने काही विशिष्ट परिस्थितींमुळे राष्ट्रीय खो-खो संघात जाण्याची संधी गमावली होती. तिच्या कुटुंबाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी ती नंतर मुलींच्या शाळेत पीटी शिक्षिकेची नोकरी स्वीकारते. 'खो-खो' हा खेळ एका प्रतिभावान खेळाडूच्या अत्यंत संबंधित कथेची पार्श्वभूमी बनवते आणि तिच्या इच्छेची ठिणगी हसतमुख आणि मजेदार किशोरवयीन मुलांमध्ये हस्तांतरित करते. मुलींसाठी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व बनून ती स्वत: तिच्या करिअरमध्ये जे मिळवू शकली नाही ते मिळवण्याचा तिने कसा प्रयत्न केला याचे वर्णन या चित्रपटातून केले आहे.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते राहुल रिजी नायर लिखित आणि दिग्दर्शित या चित्रपटात अभिनेत्री राजीषा विजयन मुख्य भूमिकेत असून ममिता बैजू, रंजीत शेखर नायर आदी कलाकार आपल्याला या चित्रपटामध्ये पाहायला मिळणार आहे.

अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंटचे एम डी आणि सीईओ सुशीलकुमार अग्रवाल म्हणतात, आमच्या जगभरातील मराठी प्रेक्षकांसाठी 'खो-खो' मराठीत प्रदर्शित करताना आम्हाला आनंद होत आहे. प्रेक्षकांना त्याच्या मातृभाषेत चित्रपटाचा आनंद घेता यावा म्हणून 'खो-खो'सारख्या चित्रपटाला मराठीत डब करण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून संपूर्ण भारतातील प्रादेशिक भाषिक कंन्टेट एकत्र करून विशेष आकर्षक कथा प्रेक्षकांसाठी प्रदान करण्याच्या हक्काच्या प्लॅटफॉर्मची आम्ही बांधिलकी दर्शवितो.

## निवडक

### पालकर विद्यालयाचे एसएससीत यश

**चौक :** सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक या माध्यमिक विद्यालयाचा ८९.६५ टक्के निकाल लागला आहे. यात निती मंगेश कदम ८७ टक्के गुण मिळवून प्रथम, हिमानी तानाजी हिमानी तानाजी ८६.८० टक्के गुण मिळवून द्वितीय, सिद्धी चंद्रहास बांदल ८५.२० टक्के गुण मिळवून तृतीय, समीक्षा संजय गायकर व विदिशा बाळाराम भोपी या ८३.८० टक्के गुण मिळवून चौथ्या तर स्नेहल संजय पराड ८१.२० टक्के गुण मिळवून पाचवी आली आहे. त्यांचे करण्यात आले.

### रातवड विद्यालयाची धवल कामगिरी


**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचा मार्च २०२३ दहावी शालांत परीक्षा निकाल सलग १०व्या वर्षी १०० टक्के लागला असून विद्यालयाच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रथम नेत्रा विनोद फराडे (९३.४० टक्के), द्वितीय साक्षी कोंडे (९२.६० टक्के), तृतीय स्वरादा कसबले (९१.४० टक्के) यांनी अनुक्रमे क्रमांक पटकावले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.


### सारंग शाळेचा ९२.८५ टक्के निकाल

**चौक :** येथील विद्यामंदिर सारंग शाळेचा निकाल ९२.८५ टक्के लागला आहे. शिर्के निशांत नरेश ८४.८ टक्के, गावंडे साहिल जयराम ७९.८ टक्के, शिर्के गायत्री जनार्दन ७८.४ टक्के, पाटील ऋशाली देविदास ७४.८ टक्के, गावंडे कल्याणी सदानंद ७४.२ टक्के गुण प्राप्त करून हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, त्यांचे अभिनंदन मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केले आहे.

# रेवदंडा-साळाव पुलाचे काम प्रगतिपथावर

## ८ ते १० जून कालावधीत संपूर्ण वाहतूक बंद राहणार





**मुरुड : प्रतिनिधी**

अलिबाग व मुरूड तालुक्याला जोडणार्‍या रेवदंडा-साळाव पुलाचे बेरिंग बदलवण्याचे काम प्रगतिपथावर आहे. या पुलास ११ गाळे असून प्रत्येक गाळ्यास चार बेरिंग बदलाव्या लागतात. त्याप्रमाणे आतापर्यंत १० गाळ्यांच्या बेरिंग बदल्यांचे काम परिपूर्ण झाले असून आता फक्त सुरुवातीचा एकच गळ्यातील बेरिंग बदलाचे काम बाकी आहे.

संपूर्ण पुलास ४४ बेरींग बसविण्याचे काम सुरू केले होते. यापैकी ४० बेरिंग बसवण्यात आलेल्या आहेत. आता फक्त चार बेरिंग बसवण्याचे काम बाकी आहे. हे सुद्धा काम प्रगतिपथावर असून येत्या दहा दिवसांत हे काम पूर्ण होईल असा विश्वास येथील काम करणार्‍या कामगारांनी व्यक्त केला आहे.

रेवदंडा खाडीवरील कुंडलिका नदीवरील पूल हा दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने २८ मार्च २०२३ या दिवसांपासून पाच टनांवरील अवजड वाहनांना दुरुस्ती होईपर्यंत सदरच्या पुलावरून वाहतूक हि बंद केली होती. त्यामुळे या पुलावरून एसटी वाहतूक सुद्धा बंद झाली होती. रेवदंडा-साळाव पुलावरून शासकीय कर्मचारी तसेच विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिक यांची रेलचेल असते. रेवदंडा बाजारपेठेत आपला माल विकणारे असंख्य भाजी व मासळी विक्रेते आहेत. या सर्व घटकांवर मोठा परिणाम होणार असून तीन दिवसासाठी प्रवासी वर्गासाठी किमान बोटीची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.


या संदर्भात प्रस्तुत प्रतिनिधीने अलिबाग-मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्याशी संपर्क साधून ही समस्या त्यांच्याकडे मांडली. त्या वेळी सर्वसामान्य प्रवासीवर्गाचे हाल होऊ नये यासाठी तीन दिवस पर्यायी बोट सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यकारी अभियंता सुखदवे यांना तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश देणार असल्याचे सांगितले. आमदार दळवी यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचा विचार केल्याबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे.

### पर्यायी जलवाहतुकीची नागरिकांकडून मागणी

**मुंबईला जोडणारा व मुरूड पर्यटनस्थळास झळाळी देणारा प्रमुख रेवदंडा-साळाव पुलाच्या बेरिंग बदलवण्याचे काम प्रगतिपथावर आहे. अलिबाग मुख्यालय गाठण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना याच पुलावरून जावे लागत आहे. ८ ते १० जून कालावधीत या पुलाचे लोड टेस्टिंगचे काम केले जाणार आहे. त्यासाठी हा पूल तीन दिवस कोणत्याही वाहनास जाण्यास मज्जाव करण्यात येणार असून पूल हा संपूर्णतः बंद करण्यात येणार आहे. अशा वेळी पर्याय म्हणून जलवाहतूक उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी चालक व प्रवाशांकडून करण्यात येत आहे.**

# आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशनतर्फे टंचाईग्रस्त भागाला पाणी

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या महेंद्र थोरवे फाऊंडेशनचे माध्यमातून कर्जत तालुक्यातील पाणीटंचाई असलेल्या भागात खासगी टँकरचे माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत टँकरने पाणी देण्यात येणार असल्याचे आमदार थोरवे यांच्याकडून जाहीर करण्यात आले आहे.

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि दुर्गम भागात अधिक प्रमाणात पाणी टंचाई जाणवु लागली आहे. स्थानिक आदिवासी ग्रामस्थांच्या मागणीनंतर कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे आणि युवक कार्यकर्ते प्रसाद थोरवे यांनी टँकरने पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशनकडून खासगी तत्वावर पाणीपुरवठा करण्यासाठी टँकर सुरू करण्यात आले आहेत. तालुक्यातील पाथरज आणि कळंब जिल्हा परिषद गटामध्ये तसेच बीड जिल्हा परिषद गटातील मधील गाव आणि वाड्यांना टँकरने पाणी पुरवले जात आहे.

आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशनचे माध्यमातून तालुक्यातील पाथरज जिल्हा परिषद गटामध्ये टंचाईग्रस्त असलेल्या बोरीवली, गुढणवाडी, पिंगलेवाडी, नालधे, कशेळे बेलदारवाडी, खरबाचीवाडी, धोत्रेवाडी, पाचखडकवाडी, मालेगाव, नवसूचीवाडी या ठिकाणी पाणी टँकरने दिले जात आहे तर कळंब जिल्हा परिषद गटामध्ये जांभूळवाडी, काठेवाडी, बेलाचीवाडी, अंभेरपाडा, घुटेवाडी, धाबेवाडी, बोंडेशेत या ठिकाणी देखील आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशन कडून पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. बीड जिल्हा परिषद गटामध्ये स्टेशन ठाकूरवाडी आणि चोचीवाडी येथील पाणी टंचाई दूर करण्यासाठी पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले आहेत. ही दोन्ही गावे शासनाच्या पाणीटंचाई आराखड्यात समाविष्ट नाहीत.

यावर्षी तालुक्यातील ५६ आदिवासी वाड्या आणि १८ गावांमध्ये पिण्याची पाण्याची टंचाई आहे. सध्या उन्हामुळे आणि अवकाळी पावसामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या वाढली आहे. पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाचे दोन टँकर मधून टंचाईग्रस्त भागात पाणी पुरवले जात आहे.

शासनाच्या टंचाईग्रस्त कृती आराखड्यात समावेश नसलेल्या गावांना आणि आदिवासी वाड्यांना पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न प्रसाद थोरवे यांच्या माध्यमातून सुरू आहे.

# माणगाव आगारामध्ये एसटी महामंडळाचा अमृत महोत्सव साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७५ वा अमृतमहोत्सव मांणगाव आगारामध्ये शनिवारी (दि. ३) सकाळी उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी बस स्थानकातील प्रवासी धोंडीराम अमृत हारवंडकर व सोनबाई अमृत हारवंडकर यांच्या हस्ते केक कापण्यात आला.

अमृतमहोत्सव निमित्ताने बस स्थानक परिसरातील स्वच्छता रांगोळी व बस स्थानकाचे सुशोभीकरण करण्यात आले होते. सडा रांगोळी काढून बस स्थानकावर प्रवाशांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी आगार व्यवस्थापक मनीषा गायकवाड तसेच सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक जगदीश भोई, नियंत्रक तुषार हाटे. सेवाशर्ती संघटनेचे अध्यक्ष चेतन जाधव. उपाध्यक्ष राहुल गायकवाड कार्याध्यक्ष दिलीप गोरेगावकर, जिल्हा प्रतिनिधी मंदार साळुंखे, सचिव रोहित पोल, रूपेश मुंडे तसेच कामगार संघटनेचे माणगाव आगाराचे अध्यक्ष राजेश यादव, एसटी कर्मचारी रवींद्र वाढवल, सुरेश शिंदे, सायली बामणे. ज्योती कासरेकर, अश्विनी स्तवे, वाहतूक नियंत्रक शिवाजी देशमुख व सर्व कर्मचारी वृंद व प्रवासी उपस्थित होते.

अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात अमृत महोत्सवी वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

# लायन्स क्लब पदाधिकार्‍यांचे पदग्रहण

**मुरूड : प्रतिनिधी**



रायगड आणि नवी मुंबई परिसरातील लायन्स क्लबचे प्रशिक्षण खोपोली इमॅजिका किंग्डम खालापूर येथील नोव्हाटेल हॉटेलच्या भव्य सभागृहात अतिशय उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात झाले.

प्रशिक्षणात रायगड आणि नवी मुंबईतील पन्नासहून अधिक लायन्स क्लबचे अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार या अतिशय मानाच्या समजल्या गेलेल्या साधारणपणे दोनशेहून अधिक पदाधिकार्‍यांना प्रशिक्षित करण्यात आले. या वेळी त्यांना, त्यांच्या अधिकार आणि कर्तव्यांची योग्य पद्धतीने माहिती करुन देण्यात आली. या क्षेत्रातील नामांकित प्रशिक्षक पंकज मेहता, द्वारका जालन, आनंद मेहता आणि इतरांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

दोन दिवस सुरू असलेल्या या प्रशिक्षणात डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन अमरचंद शर्मा, फर्स्ट व्हॉइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर एन आर परमेश्वर, सेकंड व्हॉइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संजीव सूर्यवंशी यांची उपस्थिती प्रशिक्षणाच्या भव्यतेत भर घालत होती. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एस एन मूर्ती, ज्योती नार्वेकर, नयन कवळे, अविनाश गोयल, लायन प्रवीण सरनाईक, खेमंत टेलर यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रदीप नाईक, प्रियदर्शनी पाटील, विद्या अधिकारी, विजय वनगे यांनी सदर प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

या वेळी रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रोहा, नागोठणे, महाड, मांडवा, श्रीबाग, नागाव, पेण, तर नवी मुंबईतील पनवेल, उलवे, सानपाडा, खारघर, कळंबोली, कामोठे, उरण, वाशी, नेरुळ, ऐरोली आणि परिसरातील अनेक लायन्स क्लब सहभागी झाले होते. यावर्षीच्या प्रारंभीच अशाप्रकारचा भव्य आणि दिमाखदार कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाल्याने लायन्स वर्तुळातील जाणकारांमध्ये कौतुकमिश्रित आनंद व्यक्त होत आहे.

# माणगावात खरबुजाला सुगीचे दिवस!

## तरुण शेतकर्‍याने घेतले तीन लाखांचे उत्पादन

**माणगाव : प्रतिनिधी**



रब्बी हंगामातील कडधान्याबरोबरच भाजीपाला, कलिंगडे यासारखी पिके घेत शेती उत्पन्नाच्या नव्या वाटा धुंडाळणार्‍या तरुण शेतकर्‍याने स्वतःच्या दोन एकर जमिनीवर खरबूज पीक मोठ्या प्रमाणात पिकवत अवघ्या दोन महिन्यांत तब्बल सुमारे तीन लाख रुपयाचा नफा मिळविला.

माणगाव तालुक्यातील पन्हळघर येथील युवा शेतकरी श्रीराम करकरे यांनी चालू वर्षी खरबूज लागवडीचा प्रयोग केला होता. इतर तरुणांप्रमाणे नोकरीसाठी मुंबईमध्ये न जाता गावातच राहून स्वतःची शेती व पूरक व्यवसाय करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. चालू वर्षी त्यांनी स्वतःच्या शेतीबरोबरच इतर शेतकर्‍यांचीदेखील जमीन भाड्याने घेऊन भातपिकानंतर कडधान्य चार एकर, कलिंगड दोन एकर व काकडी २० गुंठे इतक्या क्षेत्रावर पिके घेतली होती. कडधान्य पिकाला पाण्याची सोय झाल्यामुळे चांगले उत्पादन मिळाले. काकडी पिकाचेदेखील पाच टनापर्यंत उत्पादन मिळाले. खर्च वजा करता ६० ते ७० हजारपर्यंत नफा मिळाला. फेब्रुवारी ते मार्च महिन्यामध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे कलिंगड पिकाचे नुकसान झाले व केलेला खर्चदेखील निघाला नाही, परंतु यामुळे खचून न जाता करकरे यांनी उन्हाळी हंगामामध्ये दोन एकर क्षेत्रावर खरबूज पिकाची लागवड केली आणि आतापर्यंत त्यांना खरबूज पिकाचे १० टन इतके उत्पादन मिळाले. खरबुजाचे पिक तयार झाल्यानंतर त्यांनी ते विक्रीसाठी वाशी येथे पाठविले. त्यांच्या फळाची गुणवत्ता व वजन चांगले असल्याने दरदेखील चांगला मिळला. पुढील वर्षी रब्बी हंगामात पाच एकर जमिनीवर ३० हजार रोपे आणून खरबूज पीक घेणार असल्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

श्रीरामचे कौतुक स्वराज्य संघटनेचे नेते पंकज तांबे, स्वप्नील शिर्के यांनी केले आहे.

# दहावीत ‘कोएसो’च्या नागोठणेतील शाळांचे सुयश

**नागोठणे :** कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठणे येथील कै. बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील श्रीमती गु.रा. अग्रवाल विद्यामंदिर शाळेचा दहावीचा निकाल ९५.२० टक्के लागला असून नागोठणे एज्यकेशन सोसायटीच्या येथील उर्दू हायस्कूलचा दहावीच्या परिक्षेचा निकाल ९४.५९ टक्के इतका लागला आहे. अग्रवाल शाळेतील सृष्टी दत्ता श्रीवर्धनकर ९२ टक्के गुण मिळवून प्रथम, मौर्या विजेश शिवनरेश ८९.टक्के गुण मिळवून द्वितीय, श्रावणी योगेंद्र चौलकर ८८ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

याचबरोबर उर्दू हायस्कूलमधील हिबा नियाज शेख हिने ८९.८० टक्के गुण मिळवून प्रथम, आयेशा मुश्ताक दफेदर ८६ टक्के गुण मिळवून द्वितीय, झिक्रा इम्रान अन्सारी ८५.४० टक्के गुण मिळवून तृतीय आली आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# रानफळे, भाज्यांची आवक वाढली

**नागोठणे : प्रतिनिधी**



नागोठणे शहरापासून काही अंतरावरील परिसरात असणार्‍या डोंगरकपारीत पाड्या-वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव राहतात. रखरखत्या उन्हात जंगलात जाऊन येथील लोक जंगलाची काळी मैना करवंद, फळांचा राजा आंबा, जांभूळ, कोकम, फणस, बोखर, आळू आदी रानफळे तर शेवाळ भाजी, बोखरीची पाने व इतर रानभाज्या गोळा करून नागोठणे बाजारपेठेत विकण्यासाठी घेऊन येतात. ही फळे व भाज्या रुचकर व गुणकारी असल्याने मागणी वाढताना दिसून येत आहे.

नैसर्गिकरित्या पद्धतीने जंगलात पिकलेली ही फळे अतिशय चवदार व औषधी गुणधर्मकारक असल्याने ग्राहक मोठ्या आनंदाने खरेदी करत आहेत. त्याचबरोबर वर्षातून एकदाच मिळणारी व पाऊस सुरू होण्याआधी मिळणारी शेवाळाची भाजी अतिशय चविष्ट लागत असल्याने ग्राहकांच्या पहिल्या पसंतीची आहे. जंगलातील मोठ्या झाडांच्या कुशीत शेवाळाची रोपे येत असतात. ती मिळवण्यासाठी आदिवासी लोक दिवसभर वणवण करीत फिरत असतात. त्यानंतर बाजारपेठेत येऊन दिवसभर उन्हात बसून ही भाजी व फळे विकून स्वतःचा उदरनिर्वाह करतात.

# नायब तहसीलदार रवींद्र सानप यांची बदली

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तहसील कार्यालयातील महसूल विभागाचे नायब तहसीलदार रवींद्र सानप यांची उरण तहसील कार्यालयात बदली झाली आहे. यावेळी त्यांना मुरुड तहसील कार्यालकडून तसेच पत्रकार यांच्याकडून भावपूर्ण निरोप देण्यात आला.तहसीलदार रोहन शिंदे यांच्याकडून त्यांना शाल श्रीफळ पुष्पगुछ देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी महसूल अव्वलकारकून विजय म्हापुस्कर, मंडळ अधिकारी नांदगाव संजय तवर, मंडळ अधिकारी मुरुड खुशाल राठोड, तलाठी रुपेश रेवस्कर, पुरवठा अव्वल कारकून सचिन राजे आदी मान्यवर उपस्थित होते. मुरुड तहसील कार्यालयात रवींद्र सानप हे ५ वर्ष ७ महिने कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी सर्वसामान्य जनता, वरिष्ठ अधिकारी यांच्याशी सौंदर्याचे संबंध प्रस्थापित करून सर्व शासकीय कामे पूर्ण करण्यात ते यशस्वी ठरले आहेत.

सामान्य जनतेचे काम अडून राहू नये म्हणून ते स्वतः जातीने दखल घेत ती पूर्ण करून देण्यात त्यांनी नेहमीच स्वारस्य दाखवले आहे.त्यामुळे सानप याना भावपूर्ण शुभेच्छा देताना पत्रकार यांच्यसह सर्व शासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वाघरे स्कूलचा दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

दहावी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मिडीयम स्कूलचा निकाल १०० टक्के लागला असून मानसी राजेंद्र कोलवणकर हिने ९५.२० टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे.

गौरी शाम बोबाडे ९३.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, पार्थ अविनाश साळवी याने ९३ टक्के गुण मिळवून तृतीय, आशिष झंकार भूल याने ९१.४० टक्के गुण मिळवून चतुर्थ, खुशबू अजितकुमार विश्वकर्मा, हर्ष बळीराम खडतर व सार्थक दिनेश महाडिक या विद्यार्थ्यांनी ९१ टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकाविला आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे माणगाव संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

# खालापूर नगरपंचायतीच्या लेखापालाची कर्जतमध्ये बदली

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायतीमध्ये नागरिकांच्या पैशाच्या अपहार प्रकरणाने नागरिक अस्वस्थ असून दोषी कारकून कारवाईच्या कचाट्यात असताना लेखापाल अजय झोरी यांची कर्जत नगर परिषदेत बदली झाली आहे.

नागरिकांनी कर रूपाने भरलेल्या घरपट्टी, पाणीपट्टी रकमेचा वापर वैयक्तिक करण्याकरता कारकून आणि केल्यानंतर खालापूर नगरपंचायत प्रशासनाने त्यांच्या पातळीवर हे प्रकरण गुपित ठेवले होते, पण वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचा फोडल्यानंतर नगरपंचायत प्रशासनाने सारवासारव करून कारवाई करीत असल्याचे सांगितले. कारकुनाकडून पैशाची वसुली करण्यात आले असल्याचे सांगत शिल्लक रक्कम त्याच्या वेतनातून कपात केली जाईल, असे मुख्याधिकारी रश्मी चव्हाण यांनी म्हटले होते. शिवाय लेखापाल यांच्या चौकशीचे अधिकार मुख्याधिकारी म्हणून आपणास नसल्याने त्याबाबत जिल्हा प्रशासन कारवाई करेल, असेदेखील मुख्याधिकारी चव्हाण यांनी सांगितले होते.

लेखापाल अजय झोरी यांची बदली झाल्यामुळे खालापूर नगरपंचायतीचा कारभार पारदर्शक होण्यासाठी जिल्हा प्रशासन काय पावले उचलणार याकडे खालापूर नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**आयुक्त तसेच जिल्हाधिकारी कार्यालय नगर प्रशासन विभागाकडे नागरिकांच्या तक्रारी अर्ज दिला आहे. सर्व दोषींना शिक्षा होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार.**

**-वैभव भोईर, नागरिक**

## निवडक

### इमारत कामादरम्यान एकाचा मृत्यू

**पनवेल :** इमारतीच्या सहाव्या मजल्यावर काम करीत असताना अचानक खाली जमिनीवर पडुन एका ४९ वर्षीय कामगाराचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कारपेन्टरचे काम करणाऱ्या अब्दुल गुलाम रसुल हा व्यक्तइ पनवेल परिसरातील एम.डी. एल. मंदार कॉ. हौस. सोसायटीच्या बी विंग बिल्डींगचे सहाव्या मजल्यावर काम करीत असताना अचानक तोल गेल्याने खाली जमिनीवर पडून त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जगदाळे करीत आहेत.

### सोमटणे गावातून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील सोमटणे गाव येथून एक २० वर्षीय विवाहित महिला हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अवंतिका उर्फ यज्ञा योगेश पाटील असे या महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट,



रंग गोरा, चेहरा गोल, नाक पुढे मोठे, बांधा जाडजुड तसेच कपाळावर जुण्या जखमेची खुण आहे. तिने अंगात हिरवा ड्रेस, पायात सॅण्डल घातलेली असून तिला मराठी, आगरी, कोळी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पोलीस नाईक सचिन होळकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गाडीमधून ऐवजाची चोरी

**पनवेल :** शहरात ठाणा नाका येथील सर्विस रोडवर उभी करून ठेवलेल्या मारुती इको व्हॅन मधून अज्ञात चोरट्याने सायलेंसर व कॅटॅलीटीक कॅव्हर्टर चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक्सलेंट इनवायरो कंपनीमध्ये व्हॅन चालक असलेल्या राजेश केदारी यांनी कंपनीच्या नावावर असलेली मारुती इको व्हॅन (एमएच ४६ बीइझ ४१२८) शहरातील ठाणे नाका येथील धवलगिरी इमारतीच्या सर्व्हिस रोडवर उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञाताने या व्हॅनमधील ४० हजार रुपये किमतीचे सायलेंसर व कॅटॅलीटीक कॅव्हर्टर चोरून नेले. याप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे.

### सेंट झेवियर्सचा दहावीचा निकाल १०० टक्के

**नवी मुंबई :** नेरूळ येथील सेंट झेवियर्स हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेजचा मराठी आणि इंग्रजी माध्यमाचा निकाल सालाबादाप्रमाणे १०० टक्के लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन हायस्कूलच्या प्राचार्य मनीषा अंधांनसरे यांनी केले आहे. यंदाच्या वर्षी २०२२-२०२३ दोन्ही माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला आहे. इंग्रजी माध्यमांच्या देवीका रामकृष्ण कुशवाह (९७.२० टक्के) प्रथम, शर्वरी संजय कांबळे द्वितीय (९६.६० टक्के) तर तृतीय श्रेया नरेंद्र चंद्र आणि स्नेहा नंदकुमार गायकवाड (९६.६० टक्के) हिने प्राप्त केला तर मराठी माध्यमाच्या दहावी परीक्षेत प्रथम क्रमांक सुहानी कालेकर (९३.८० टक्के) कल्याणी मोरे द्वितीय (९१.४० टक्के) तर तृतीय ऋतुजा पवार (८८.६० टक्के) यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील उज्ज्वल शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा मिळत आहेत.

### पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** रेल्वे पोलीस स्टेशन परिसरात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्ष असून तो पनवेल रेल्वे बाजुला असलेल्या नवनाथ झोपडपटी फूटपाथवर पोलिसांना आढळून आला. या व्यक्तीचा मृत्यू कोणत्यातरी शारिरिक आजाराने झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या व्यक्तीबाबत कोणास काही माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र जगदाळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत लवकरच महाराष्ट्र भवन साकारणार

## मुख्यमंत्र्यांचे सिडकोला निर्देश; आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबईतील प्रश्नांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. १) सह्याद्री अतिथीग्रहात एक बैठक झाली. या बैठकीला भाजपच्या आमदार मंदा मात्रे यांच्यासह नवी मुंबईतील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

वाशी सेक्टर ३० ए येथील आरक्षित भूखंडावर भव्य दिव्य असे महाराष्ट्र भवन उभारण्याकरिता २०२२ साली अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधीची तरतूद करण्यात यावी याकरिता बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तब्बल १०० कोटी रुपये महाराष्ट्र भवन निर्मितीसाठी तरतूद केल्याचे जाहीर करण्यात आले होते. याकरिता आमदार मंदा म्हात्रे या महाराष्ट्र भवनासाठी कायम आग्रही राहिल्या आणि आजपर्यंत राहत आहेत, तसेच नवी मुंबई शहर वसवितांना सिडकोमार्फत वाशी येथे राज्यनिहाय भवन निर्मितीसाठी भूखंड उपलब्ध करून दिले गेले.



राज्यनिहाय दिल्या गेलेल्या सर्व राज्यांची भवने नवी मुंबई वाशी येथे उभी आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, अशा विविध ठिकाणाहून नागरिक कामांसाठी विविध स्पर्धा परीक्षा व नोकरभरतीसाठी मुंबई येथे येत असतात, मात्र जागा नसल्याने व हॉटेलचा खर्च परवडत नसल्याने अनेक जण मिळेल तो आसरा शोधतांना दिसतात. याच अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या सह्याद्री अतिथीगृहामध्ये महाराष्ट्र भवनाची सादरीकरण केले.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्र भवनाच्या आराखड्यामध्ये अजून काही महाराष्ट्र संस्कृतीच्या वारसा त्याच्यात टाकता येईल का व सदर महाराष्ट्र भवन हा भव्य दिव्य कसा होईल याकडे लक्ष केंद्रित करावे व महाराष्ट्र भवन उभारण्याकरिता जी काही जीएसटीसह अंदाजे ८० लाख रुपये अजून सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सिडकोला भरवायचे होते, तेही माफ केले व महाराष्ट्र भवन सिडकोने उभारावे असा आदेश सिडको व्यस्थापकीय संचालक संजय मुखर्जी व संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, डॉ. राजेश पाटील, ज्येष्ठ पत्रकार अंकुश वैती, नगरविकास खात्याचे मुख्य सचिव भूसन गगराणी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव सानिया सेठी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास नवी मुंबई आयुक्त राजेश नार्वेकर व अधिकारी वर्ग आदी उपस्थित होते.

## प्रतिबंधात्मक कारवाईत ४५० किलो प्लास्टिक जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुक्त नवी मुंबईचे लक्ष्य नजरेसमोर ठेवून नागरिकांमध्ये एकल प्लास्टिकचा वापर करू नये, याबाबत जनजागृती करतानाच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमांद्वारे एकल प्लास्टिकच्या वापर आढळल्यास विभाग कार्यालयांमार्फत धडक कारवाई केली जात आहे. मे २०२३ महिन्यामध्ये विभाग कार्यालयांतील प्लास्टिक प्रतिबंधात्मक पथकांमार्फत विशेष कारवाई करीत ५० व्यक्ती व दुकानदारांकडून २ लक्ष ५० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच १६९.५ कि.ग्रॅ. प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक



प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

जून महिन्याच्या पहिल्याच दिवशी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निर्देशानुसार, परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे यांच्या नियंत्रणाखाली, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त शशिकांत तांडेल यांच्या नेतृत्वाखाली प्लास्टिक प्रतिबंधात्मक पथकाने धडाकेबाज कारवाई करत ३३ दुकानांवर व पाच व्यक्तींवर कारवाई करून ४५० किलो इतक्या मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या व प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा साठा जप्त केला आहे. त्याचप्रमाणे दोन लक्ष २५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल केलेली आहे.

या मोहीमेमध्ये प्रशासकीय अधिकारी रमेश राठोड यांच्यासह स्वच्छता अधिकारी पवन कोवे, स्वच्छता निरीक्षक किरण सोळस्कर, विजय नाईक, मिलिंद तांडेल, नवनाथ ठोंबरे, वरिष्ठ लिपिक लेखा मनोज सुतार, वरिष्ठ लिपिक स्वप्निल तारमळे, लिपिक धीरेन भोईर, विठ्ठल देसले व नयन भोईर सहभागी झाले होते.

## पनवेलमध्ये पर्यावरण दिनानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका आणि भारत विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ५) जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सिंगल युज प्लॅस्टिकला पर्याय असणाऱ्या कापडी पिशव्या तयार करण्यात आल्या आहेत. या पिशव्यांचे अनावरण या कार्यक्रमामध्ये करण्यात येणार आहे, तसेच जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी सकाळी १०.३० आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख, भारत विकास परिषद संस्था प्रांताचे अध्यक्ष श्रीकांत भाराटिया, म्हाडा अध्यक्ष किर्ती समुद्रा, माजी नगरसेवक, भारत विकास परिषद संस्थांचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन करण्यात येणार आहे.

केंद्रीय गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाच्यावतीने मेरी लाइफ मेरा स्वच्छ शहर हे अभियान दिनांक १५ मे पासून ते ५ जूनपर्यंत पालिका क्षेत्रात राबविले जात आहे. या अभियानाचा समारोप या वेळी करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धांचे बक्षीस समारंभ तसेच सर्वोकृष्ट काम केलेल्या प्रभागाची निवड केली जाणार आहे.

शासन निर्देशाप्रमाणे मिशन लाईफ अंतर्गत ऊर्जा बचत, पाणी बचत, सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, ई-कचरा कमी करणे, शाश्वत अन्न प्रणालीचा स्वीकार करणे, कचरा कमी करणे आणि निरोगी जीवनशैलीचा स्वीकार या सात घटकांवर महापालिका काम करणार आहे. याविषयीची शपथ या कार्यक्रमात घेतली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी स्वच्छता दूत, बचत गटाचे सदस्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## पनवेल महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना सेवानिरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेतील सेवेमध्ये असणारे उपमुख्य लेखा अधिकारी विनयकुमार पाटील, सहाय्यक आयुक्त हरिश्चंद्र कडू, अधिक्षक विजय कोळी, अग्निशमन विभाग प्रमुख अनिल जाधव, अग्निशामक अनंता गायकवाड, सफाई कामगार शांताराम तांबे यांचा निरोप समारंभ आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि. ३१) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये करण्यात आला.



या वेळी उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त नामदेव पिचड, प्रभाग समिती अ, ब, क, ड चे प्रभाग अधिकारी, भांडार विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, जन्म मृत्यू विभाग प्रमुख हरेश जाधव यांनी व महापालिका अधिकारी, कर्मचारी, निवृत्त अधिकाऱ्यांचे कुटूंबिय उपस्थित होते. उपमुख्य लेखाधिकारी विनय पाटील यांनी रायगड जिल्हा परिषद, शिक्षण, आरोग्य, बांधकाम, पंचायत समिती, जिल्हा कोषागार कार्यलय या ठिकाणी काम केले होते. याचबरोबर गेल्या दोन वर्षांपासून पनवेल महापालिकेत ते प्रतिनियुक्तीवर उपमुख्य लेखा परिक्षक म्हणून काम करीत होते. सहाय्यक आयुक्त हरिश्चंद्र कडू हे नगर परिषद काळात जकात नाका कारकून म्हणून सेवेत रूजू झाले होते. महापालिका झाल्यानंतर प्रभाग ड प्रभाग अधिकारी, कर वसुली, स्थानिक संस्था कर अशा विविध विभागामध्ये त्यांनी काम करताना महत्वाचे योगदान दिले.

नगर परिषद काळापासून कार्यरत असलेले अग्निशमन विभाग प्रमुख अनिल जाधव यांनीही आपल्या सेवाकाळात पालिकेला भरीव योगदान दिले. याचबरोबर अधिक्षक विजय कोळी, अग्निशामक अनंता गायकवाड, सफाई कामगार शांताराम तांबे यांनीही महापालिकेच्या सेवा काळात दिलेले मौल्यवान योगदान दिले.



## पॅनेसिया हॉस्पिटलची सोनारी येथे शाखा

**पनवेल : वार्ताहर**

पॅनेसिया हॉस्पिटलने उरण तालुक्यातील सोनारी येथे आपल्या विस्तारित शाखेचा शुभारंभ केला. उत्तर प्रदेशचे कॅबिनेट मंत्री आशिष सिंग पटेल यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १) रुग्णालयाचे लोकार्पण झाले.

या वेळी महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्पेशल सिक्युरिटी विभागाचे पोलीस महासंचालक बिपिन कुमार सिंग, निवृत्त भा.प्र.से. अशोक सिन्हा, निवृत्त भा.प्र.से. रंजना सिन्हा, सोनारीच्या सरपंच पूनम कडू आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. सुभाष सिंग यांना शुभेच्छा देण्यासाठी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जेएनपीएच्या विश्वस्त तथा संचालिका नूतन पाटील, जेएनपीए रुग्णालयाचे व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर हिंगोरानी, रोटरी प्रांतपाल तथा प्रसिद्ध डॉ. गिरीष गुणे, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण, अखिल भारतीय कुणबी समाजच्या मुंबई विभागाचे अध्यक्ष बाबूलाल सिंग, हरीश वर्मा आदी उपस्थित होते.

**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त भारतीय मजदुर महासंघाचे महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी इतर मान्यवर, सहकारी उपस्थित होते.**



## पावसाळा कालावधीत सजग राहण्याच्या सूचना

### पनवेल मनपा उपायुक्तांची वृक्ष प्राधिकरण विभागासोबत चर्चा

**पनवेल : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होण्यापूर्वी धोकादायक झाडे तसेच झाडांच्या फाद्यांच्या छाटणीचे काम पुर्ण करणे, वाहतुकीला अडथळा आणणारी तसेच मोडकळीस आलेल्या झाडांचे तोडक काम जलदगतीने संपवणे. पावसाळा कालावधीमध्ये येणाऱ्या विविध प्रसंगासाठी सजग राहून आपत्ती काळात रस्त्यात पडलेली झाडे, फांद्या ताबडतोब हलवण्याची सूचना वृक्ष प्राधिकरण विभागाच्या बैठकीत उपायुक्त कैलास गावडे यांनी दिल्या आहेत.

पावसाळा कालावधीमध्ये येणाऱ्या विविध प्रसंगासाठी सजग राहण्याच्या सूचना संबधित विभागास आयुक्तांनी दिल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर



> **मान्सूनपूर्व कामांमध्ये महापालिका हद्दीतील चारही नोडमधील धोकादायक झाडांच्या फाद्यांची छाटणी केली जात आहे. खारघर, कामोठे, कळंबोली येथील मुख्य रस्त्यांवरील झाडांच्या फाद्यांची छाटणीचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. पावसाळ्यात रस्त्यांत झाडे पडणे किंवा झाडांच्या फांद्या रस्त्यात पडल्यास नागरिकांनी पालिकेमध्ये ०२२-२७४६१५००, टोल फ्री १८००२२७७०१ या क्रमांकावर संपर्क साधावा.**
>
> **-कैलास गावडे, उपायुक्त**

गुरुवारी (दि. २) रोजी वृक्ष प्राधिकरण विभागाची बैठक उपायुक्त कैलास गावडे यांनी आपल्या दालनात घेतली. या वेळी पावसाळ्यातील आपत्ती काळात रस्त्यात पडलेली झाडे, फांद्या ताबडतोब काढण्याच्या दृष्टीने सर्व तयारी करण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. या बैठकीस वृक्ष प्राधिकरण विभाग प्रमुख संदिप पवार तसेच विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

वृक्ष प्राधिकरण विभागास आवश्यक असणारी लॅडर, चेन, कटर इतर आवश्क यंत्रसामुग्री तसेच मनुष्यबळ याविषयीचा आढावा यावेळी उपायुक्तांनी घेतला, तसेच कमी पडणारे साहित्य तात्काळ देण्याबाबत भांडार विभागास आदेशित करण्यात आले. पावसाळ्यात आपत्तीच्या ठिकाणी तत्परतेने जाऊन तेथील समस्या सोडविण्याविषयीच्या सूचना कर्मचाऱ्यांना दिल्या.

## लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमचा पदग्रहण समारंभ

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमचा पहिलाच पदग्रहण समारंभ नुकताच गोखले हॉल पनवेल येथे एका शानदार समारंभात झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल मुकेश तनेजा तर विशेष अतिथी म्हणून माजी प्रांतपाल मानेश्वर नायक, मेंबरशिप कमिटी चेअरमन भरत दत्त उपस्थित होते.




पनवेल लायन्स क्लबचे अध्यक्ष हेमंत ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. क्लब एक्स्टेंशन चेअरमन संजय गोडसे यांनी क्लब स्थापनेचा उद्देश सांगितला. माजी प्रांतपाल मानेश्वर नायक यांनी सरगम क्लबच्या सर्व नवीन सभासदांना शपथ दिली, मार्गदर्शन केले व अनेक समर्पक उदाहरणे देऊन लायनीझमचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले की, लायन्स इंटरनॅशनल ही जगातील सर्वांत मोठी एन. जी. ओ. आहे व या संस्थेच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करता येतील.

मुख्य अतिथी प्रांतपाल मुकेश तनेजा यांनी पनवेल लायन्स क्लबचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, एक्स्टेंशन चेअरमन संजय गोडसे, सुयोग पेंडसे व गायडींग लायन मदन गोवारी यांचे पनवेल सरगमचि स्थापना केल्याबद्दल कौतुक केले. सरगम क्लबचे सर्व सभासद विविध क्षेत्रात पारंगत असून पनवेल सरगम क्लब आपल्या कार्याने पनवेल परिसरात नाव उज्ज्वल करेल असा विश्वास तनेजा यांनी व्यक्त केला. तनेजा यांनी क्लबचे नवीन अध्यक्ष स्वाती गोडसे, सचिव संविदा पाटकर, खजिनदार अलकेश शहा, उपाध्यक्षा मानदा पंडीत, सहसचिव सुजया देशपांडे, सहखजिनदार धवल शहा, संचालक प्रेमेंद्र बहिरा, जयेश मणियार, प्रशांत सागवेकर, मोनाली आजगावकर, सुनील देशपांडे, साहिल भोईर व भक्ती पटवर्धन यांना आपल्या पदाची जबाबदारी सांगून शपथ दिली.

# टीम इंडिया नव्या रूपात

## बीसीसीआयने शेअर केला व्हिडीओ




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये टीम इंडियाचा सामना ऑस्ट्रेलियाशी ७ जूनपासून ओव्हल येथे होणार आहे. या सामन्यापूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) टीम इंडियाची शैली पूर्णपणे बदलली असून एक खास व्हिडीओ शेअर केला आहे.

या व्हिडीओमध्ये टीम इंडियाच्या ब्लू जर्सीचा नवा लूक पाहायला मिळत आहे. अलीकडेच बीसीसीआयने किट प्रायोजक कंपनी बदलली होती. त्यानंतर इंग्लंडमध्ये सरावादरम्यानही संघातील खेळाडू नव्या रूपात दिसले. आता बीसीसीआयने पांढऱ्या चेंडूच्या जर्सीचा व्हिडीओ शेअर केला आहे.

बीसीसीआयने एक व्हिडीओ शेअर केला, ज्यामध्ये पुरुष संघाचा कर्णधार रोहित शर्मा, महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर यांच्यासह अनेक खेळाडू दिसत आहेत. विराट कोहलीसोबत हार्दिक पांड्या, शुभमन गिल, जसप्रीत बुमराह, स्मृती मानधना, रेणुका ठाकूर या महिला स्टार्सही दिसत आहेत.

बीसीसीआयने या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये ट्विटरवर लिहिले की, या जर्सीतून एकच गोष्ट जाणवते की काहीही अशक्य नाही. या व्हिडीओनंतर काही वेळातच रोहित शर्मा आणि विराट कोहलीचे कसोटी जर्सीतील फोटोही सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले.

लंडनच्या केनिंग्टन ओव्हलवर बुधवारपासून भारतीय संघ सराव सामना खेळणार आहे. टीम इंडियाची ही सलग दुसरी फायनल आहे. गेल्या मोसमात न्यूझीलंडकडून अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला आणि उपविजेता ठरला. या वेळी रोहित शर्माच्या संघाला आयसीसी ट्रॉफीसाठी १० वर्षांची प्रतीक्षा संपवायची आहे.

# रायगड सबज्युनियर मुलींचा क्रिकेट संघ जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे सबज्युनियर (१५ वर्षांखालील) मुलींचा क्रिकेट संघ जाहीर करण्यात आला आहे. हा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या १५ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे सबज्युनियर मुलींची निवड चाचणी २१ मे रोजी खालापूर तालुक्यातील लोधिवली येथील रिलायन्स टाऊनशिप मैदानावर घेण्यात आली. या निवड चाचणीतून रायगडचा संघ निवडण्यात आला, अशी माहिती रायगड क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे य १५ वर्षांखालील मुलींची आमंत्रितांची क्रिकेट स्पर्धा नाशिक येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत रायगडचा संघ सहभागी होईल.

**रायगडचा संघ**

सेजल जगताप, प्रियांशी गायकवाड, रोशनी पारधी, ईश्वरी खेत्री, अनिष्का वर्मा, समिधा तांडेल, वैभवी कुलकारी, आर्या पाटील, आर्या गदादे, मधुरा बाबर, शुभांगिनी दास, बनशिका मोहिते, निशीता विठलानी, वेदश्री शेळके, मनीषा लांबोरे, ज्ञानश्री येरुणकर, स्नेहल पवार, भारती रे, आनंदी कुळकर्णी.

## थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत

# लक्ष्य सेन उपांत्य फेरीत



**बँकॉक : वृत्तसंस्था**

भारताच्या लक्ष्य सेनने सातत्यपूर्ण खेळ करताना शुक्रवारी थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. लक्ष्यने कमालीचा आक्रमक खेळ करताना मलेशियाच्या लेऑँग जुन हाओचे आव्हान २१-१९, २१-११ असे संपुष्टात आणले. लेऑँगने पात्रता फेरीतून उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली होती. पात्रता फेरीतून उपांत्यपूर्व फेरी गाठणाऱ्या भारताच्या किरण जॉर्जलाही पराभवाचा सामना करावा लागला. फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोवने किरणला २१-१६, २१-१७ असे पराभूत केले.

लक्ष्यने यंदाच्या हंगामात प्रथमच आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करताना उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली आहे. यापूर्वीच्या सहा स्पर्धांमध्ये निराशाजनक कामगिरी केल्याने लक्ष्यची जागतिक क्रमवारीत २३व्या स्थानापर्यंत घसरण झाली, पण थायलंड स्पर्धेत त्याने अप्रतिम कामगिरी केली आहे. या स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य आणि लेऑँग यांच्यातील पहिला गेम चुरशीचा झाला. पहिल्या गेमच्या मध्यात लक्ष्य १०-११ असा पिछाडीवर होता. मध्यानंतरही लेऑँगचा झपाटा कायम राहिला. लेऑँगने एकवेळ १६-१० अशी आपली आघाडी वाढवली. त्यानंतर लक्ष्यने रॅलीजमधील वेग वाढवला आणि जोरकस स्मॅशने लेऑँगला निष्प्रभ करीत १७-१७ अशी बरोबरी साधली. त्यावेळी लेऑँग दमलेला वाटत होता. याचा फायदा घेत लक्ष्यने आपल्या खेळातील आक्रमकता वाढवून पहिला गेम दोन गुणांच्या फरकाने जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये तीच लय कायम राखताना लक्ष्यने ११-८ अशी आघाडी घेतली. गेमच्या मध्यानंतर एकवेळ लक्ष्यची आघाडी १३-११ अशी कमी झाली, मात्र त्यानंतर लक्ष्यने सलग आठ गुणांची कमाई करताना विजयावर शिक्कामोर्तब केले.

उपांत्य फेरीत लक्ष्यसमोर दुसऱ्या मानांकित थायलंडच्या कुनलावूत वितिदसार्नचे आव्हान असेल.

# कराटे स्पर्धेत मार्शल आर्ट्स स्पोर्ट्स अकॅडमीला उपविजेतेपद



**नागोठणे : बातमीदार**

नेपाळमधील काठमांडू येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिपमध्ये मार्शल आर्ट्स स्पोर्ट्स अकॅडमी रायगडच्या खेळाडूंनी उपविजेतेपद पटकाविले. त्यांनी प्रत्येकी सहा सुवर्ण व रौप्य पदक तसेच नऊ कांस्यपदकांची कमाई करून जिल्ह्याचे नाव उंचावले आहे.

या स्पर्धेत रिया मोहन पाटील, सार्थक सावंत, पार्थ सावंत, स्वरूप पवार, सनया निगुडसे व भूमी भोईर यांनी सुवर्ण; दिया म्हात्रे, सानिया वझरकर, दुर्वा म्हात्रे, स्मित कामतेकर, आशांक पाटील, समर कांबळे यांनी रौप्य; तर आर्या दपके, सेजल म्हात्रे, सानिया जाधव, आराध्य पाटणकर, हर्ष ठाकूर, मनीष म्हात्रे, प्रथमेश म्हात्रे, करण जाधव, आयुष म्हात्रे यांनी कांस्यपदक मिळविले. सर्वांचे कौतुक होत आहे. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक मास्टर कल्पेश शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले.



मुंबई : राज्य बॅडमिंटन टूर्नामेंटमध्ये सब-ज्युनियर मुलींच्या एकेरीत रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अंतर्गत योगेश पाटील बॅडमिंटन अकॅडमीची खेळाडू आदिती यादव हिने प्रथम विजेतेपद पटकाविले. याबद्दल तिला बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –**मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com